





संपादक : काकासाहेब नवले । RNI NO.MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रु. ४.००। अंक २७५ । रविवार, दि.१९ जुलै २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Sahyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com




## महत्वाचे...

### जप्त वाळूचे घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाटप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील भामाठाण येथे गोदावरी नदीपात्रातून महसूल पथकाने जप्त केलेल्या २९७ ब्रास वाळूचा सामाजिक उपयोग करत ती गरजू घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाटप करण्यात आली आहे.

वाळू चोरीला जाण्याची शक्यता लक्षात घेऊन महसूल प्रशासनाने हा निर्णय घेतल्याची माहिती तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी मिलिंदकुमार वाघ यांनी दिली.महसूल प्रशासनाने केलेल्या कारवाईत ११ जुलै रोजी गोदावरी नदीपात्रातील अनधिकृत वाळूसाठा जप्त करण्यात आला होता. त्यानंतर संबंधित वाळू सुरक्षित ठेवण्याऐवजी शासनाच्या लोकहिताच्या धोरणानुसार गरजू घरकुल लाभार्थ्यांना मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला.

(उर्वरीत पान ४ वर)

# सोनम वांगचुक यांना बळजबरी हटवले!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी, अनियमितता आणि केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीतील जंतर-मंतर येथे गेल्या २१ दिवसांपासून आमरण उपोषण करणारे पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांना शनिवारी सकाळी दिल्ली पोलिसांनी आंदोलनस्थळावरून हटवून सफदरजंग रुग्णालयात दाखल केले. त्यांच्या प्रकृतीत सातत्याने बिघाड होत असल्याने ही कारवाई करण्यात आल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. या घटनेनंतर जंतर-मंतर परिसरात तणाव निर्माण झाला असून आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत पोलिसांच्या कारवाईचा निषेध केला.दिल्ली उच्च न्यायालयाने यापूर्वी वांगचुक यांच्या








* जंतर-मंतरवरील कारवाईने देश हदरला
* देशभरात राजकीय वाद पेटला
* राहुल गांधींचा सरकारवर हल्लाबोल
* पेपरफुटीविरोधातील लढा तीव्र
* अभिजित दीपके यांची मोदींच्या राजीनाम्याची मागणी

आरोग्याबाबत गंभीर चिंता व्यक्त करत दररोज वैद्यकीय तपासणी आणि आवश्यक उपचार करण्याचे निर्देश दिले होते. त्याच पार्श्वभूमीवर पोलिसांनी वैद्यकीय कारणास्तव त्यांना रुग्णालयात हलवल्याचे सांगितले. मात्र, आंदोलनकर्त्यांनी ही कारवाई जबरदस्तीची असल्याचा

**आंदोलनातील प्रमुख घडामोडी**

२८ जूनपासून सोनम वांगचुक यांचे आमरण उपोषण.
धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा, एनटीए चौकशी, परीक्षा सुधारण्याची मागणी
२१ व्या दिवशी पोलिसांनी जंतर-मंतरवरून हटवून सफदरजंग रुग्णालयात दाखल केले.
वांगचुक यांचे सुमारे २०% वजन घटल्याचा दावा.
दिल्ली उच्च न्यायालयाने दररोज वैद्यकीय तपासणीचे निर्देश दिले होते.
पत्नी गीतांजली अंगमो यांचे इंजेक्शन व सलाईनबाबत आक्षेप.
२० जुलैच्या 'चलो संसद' मोर्चापूर्वीच कारवाई.
अभिजित दीपके यांच्यावर शाईफेक

एका महिलेने शाईफेक केल्याने काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. दीपके यांनी आंदोलनात पैसे देऊन गुंड घुसवल्याचा गंभीर आरोप केला.

वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली अंगमो यांनी सफदरजंग रुग्णालय प्रशासनाला पत्र लिहून त्यांच्या परवानगीशिवाय कोणतेही इंजेक्शन किंवा सलाईन देऊ नये, तसेच त्यांना अन्य रुग्णालयात हलवण्याची मागणी केली आहे. वांगचुक यांनी स्वतःही औषधे आणि सलाईन घेण्यास नकार दिल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर टीका करत, खोटेपणा आणि हिंसाचार ही मोदी सरकारची मूलभूत तत्त्वे आहेत.

(उर्वरीत पान ४ वर)

# विकासाला वेग : तीन उन्नत महामार्ग पुण्यासाठी ठरणार 'गेम चेंजर'

## पुणे-शिरूर, हडपसर-यवत व तळेगाव-चाकण-शिक्रापूर प्रकल्पांना गती; वाहतूक कोंडीसह औद्योगिक विकासालाही मोठी चालना

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** पुण्याच्या वाढत्या वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाय करत शहराच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा देणारे पुणे-शिरूर, हडपसर-यवत आणि तळेगाव-चाकण-शिक्रापूर हे तीन महत्त्वाकांक्षी उन्नत महामार्ग प्रकल्प राज्याच्या विकासातील 'गेम चेंजर' ठरणार असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केले. अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पुणे परिसरातील प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि सुलभ होणार असून औद्योगिक,



व्यापारी आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रालाही मोठी चालना मिळणार आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली व सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हे महत्त्वाचे प्रकल्प मार्गी लागल्याचे त्यांनी सांगितले.

सुनेत्रा पवार म्हणाल्या, पुणे हे केवळ विद्येचे माहेरघर नसून उद्योग, माहिती तंत्रज्ञान आणि रोजगाराचे प्रमुख केंद्र म्हणून झपाट्याने विकसित होत आहे. पुणे मेट्रो, रिंगरोड, विमानतळ विस्तार, हिंजवडी आयटी पार्क, पिंपरी-चिंचवड आणि चाकण-तळेगाव औद्योगिक पट्ट्याच्या विकासासाठी शासन आवश्यक निधी उपलब्ध करून देत आहे. नाशिक फाटा-राजगुरूनगर उन्नत महामार्गालाही भूसंपादनातील अडचणी दूर करून गती देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री भोसले यांनी सांगितले की, राज्याला एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा उभारणे आवश्यक आहे. बदलत्या हवामानाचा विचार करून आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे दर्जेदार रस्ते उभारले जात असून, सासवड-पुरंदर विमानतळ, शहराचा विस्तार आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन भविष्योन्मुख नियोजन केले जात आहे. पुण्यात ३०० किलोमीटरहून अधिक सायकल ट्रॅक विकसित करण्याचाही शासनाचा मानस असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या तिन्ही प्रकल्पांमुळे पुणे, पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील वाहतूक व्यवस्थेत आमूलाग्र बदल होणार असून, राज्यात देशातील सर्वाधिक लांबीचा उन्नत महामार्ग उभारला जाणार असल्याचा दावाही यावेळी करण्यात आला.

# अश्लील शिव्या, अपशब्द फौजदारी कायद्यानुसार अश्लील नाहीत!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** 'गाव तशी भाषा' असं आपण म्हणतो किंवा दर ३० किलो मीटरनंतर भाषेचा टोन बदलला जातो, तेथील बोलीभाषेतील काही शब्द या भाषेत येतात. अनेकदा काही ठिकाणची एखादी शिवी दुसऱ्यासाठी दैनिक वापरातील शब्दही असतो. त्यामुळे, शिव्यांमधील प्रत्येक शब्द अश्लील आहे का नाही, त्याचा अर्थ नेमका काय यावरुन वादविवाद होण्याची शक्यता असते. मात्र, आता सर्वोच्च न्यायालयाने शिवीगाळ म्हणून वापरल्या जाणाऱ्या दोन शब्दांबद्दल स्पष्टपणे निर्वाळा दिला आहे. अपमानजनक भाषा, अश्लील शिव्या किंवा अपशब्द मग ते कितीही आक्षेपार्ह किंवा असभ्य असले तरी फौजदारी कायद्यानुसार अश्लील ठरत नाहीत.

जोपर्यंत संबंधित शब्द हे कामुक भावना जागृत करणारे, वासनाधीन आणि पीडित व्यक्तीच्या नैतिकेतचं अधः पतन किंवा चारित्र्यहनन करण्यास प्रवृत्ती असल्याचे कायदेशीर कसोटीवर पूर्ण ठरत नाही, तोपर्यंत मादर** आणि सन ऑफ अ*व्होर हे शब्द अश्लील ठरत नाहीत, असे सर्वोच्च न्यायालयाने एका खटल्यातील सुनावणीवेळी स्पष्ट केले.

सर्वोच्च न्यायालयातील न्या. संजय करोल आणि न्या. विपुल एम. पांचोली यांच्या खंडपीठाने

(उर्वरीत पान ४ वर)






# भारताच्या खासगी अंतराळ क्षेत्रात नवा इतिहास

## 'विक्रम-१' रॉकेटचे यशस्वी प्रक्षेपण

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** भारताच्या खासगी अंतराळ क्षेत्रासाठी ऐतिहासिक ठरलेल्या स्कायरूट एरोस्पेसच्या 'विक्रम-१' रॉकेटचे श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रावरून यशस्वी प्रक्षेपण करण्यात आले. इस्रोनंतर प्रथमच एका भारतीय खासगी कंपनीने ऑर्बिटल रॉकेटचे यशस्वी प्रक्षेपण करून नवा इतिहास रचला.

'मिशन अरायव्हल' अंतर्गत पार पडलेल्या या मोहिमेत पूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानावर विकसित करण्यात आलेल्या 'विक्रम-१'ने नियोजित उड्डाण यशस्वीरीत्या पूर्ण केले. हे रॉकेट व्यावसायिक उपग्रह अचूक कक्षेत प्रस्थापित करण्यास सक्षम असून, या यशामुळे जागतिक उपग्रह प्रक्षेपण क्षेत्रात भारताच्या खासगी उद्योगाला मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

या मोहिमेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे प्रथमच खासगी भारतीय रॉकेटद्वारे सोने आणि हिरे यांसारख्या विशेष वस्तू अंतराळात पाठविण्यात आल्या. या यशस्वी प्रक्षेपणामुळे भारताच्या अंतराळ तंत्रज्ञानातील आत्मनिर्भरतेला बळ मिळाले असून, खासगी अंतराळ उद्योगासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. तसेच भविष्यात भारत जागतिक व्यावसायिक उपग्रह प्रक्षेपण बाजारात अधिक प्रभावी भूमिका बजावेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# ज्येष्ठ समाजवादी नेते, माजी आमदार डॉ. कुमार सप्तर्षी यांचे निधन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**राशीन :** ज्येष्ठ समाजवादी नेते, पुरोगामी विचारवंत, 'युवक क्रांती दला'चे (युक्रांद) संस्थापक आणि महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी यांचे निधन झाले, ८५ व्या वर्षी त्यांनी अखरेचा श्वास घेतला.

त्यांना मधुमेहाचा त्रास होता आणि अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना पुण्यातील एरंडवणे येथील खासगी रुग्णालयात नेले होते. मात्र, उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. डॉ. कुमार सप्तर्षी हे महाराष्ट्रातील एक प्रमुख पुरोगामी विचारवंत होते. लोकशाही मूल्यांचा आग्रह धरत असतानाच सामाजिक न्यायाच्या लढ्यात ते कायम अग्रेसर असत. विधिमंडळ सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले असून आपल्या कार्याची वेगळी ओळख निर्माण केली होती.कुमार सप्तर्षी यांचा मुलगा कबीर सप्तर्षी इंग्लंडहून आल्यानंतर सोमवारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होतील, अशी माहिती निकटवर्तीयांनी दिली. सोमवारी सकाळी दहा ते बारा वाजेपर्यंत त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी कोथरुडमधील गांधी भवन इथं ठेवलं जाईल, त्यानंतर अंत्यसंस्कार होतील, अशी देखील माहिती संबंधितांनी दिली.

**डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आहे. पुरोगामी विचारवंत, गांधीवादी आणि सामाजिक न्यायासाठी अखेरपर्यंत लढणारे नेतृत्व आपण गमावले आहे. विधानपरिषदेतील त्यांचे योगदान आणि समाजकारणातील संघर्ष कायम स्मरणात राहील. द्वेष, हिंसा व विषमतेच्या काळात मानवता आणि गांधी विचारांचा दीप जपणारा सच्चा पाईक हरपला आहे.**

**-आ. रोहित पवार**

# दोन्ही हाताचे पंजे तोडणाऱ्या चौघांना पैठणमध्ये पकडले

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यात खळबळ उडवून देणाऱ्या रोहिदास हरिश्चंद्र दांगडे यांच्या दोन्ही हाताचे पंजे तोडून निर्घृण प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. या गुन्ह्यातील फरार झालेल्या चौघा आरोपींना पकडण्यात श्रीगोंदा पोलिसांना यश आले. फरारी चौघाजणांना छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण येथून शिताफीने अटक करण्यात आली आहे. चौघा आरोपींना न्यायालयाने त्यांना सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, ११ जुलै २०२६ रोजी दुपारी गणपती मळा, सुपेकर वस्ती येथे जुन्या राजकीय व भावकीच्या वादातून रोहिदास दांगडे यांच्यावर धारदार शस्त्रांनी जीवघेणा हल्ला करण्यात आला होता. या अमानुष




**भावकीच्या वादातून हल्ला**

हल्ल्यात त्यांच्या दोन्ही हातांचे मनगटापासून पंजे तोडण्यात आले होते. या घटनेने संपूर्ण श्रीगोंदा तालुक्यात संतापाची लाट उसळली होती.

या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान मुख्य आरोपी परशुराम सुभाष दांगडे, अभयराज संजय दांगडे, सागर सुनील दांगडे आणि तुषार बबन दांगडे (रा. घुगलवडगाव) हे फरार होते. गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे श्रीगोंदा पोलिसांनी पैठण येथे सापळा रचून चौघांनाही जेरबंद केले.

(उर्वरीत पान ४ वर)

# श्रीरामपूरला सुरक्षिततेची नवी ढाल..!

* पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांचे स्पष्ट आश्वासन
* व्यापारी-उद्योजकांच्या सुरक्षेसाठी 'बीट इंचार्ज' प्रणाली
* गुन्हेगारांना कायद्याचा धाक दाखवणार
* तक्रार दाखल न झाल्यास थेट संपर्क साधा
* एमआयडीसी व व्यापारी भागात दिवस-रात्र नियमित गस्त.
* व्यापारी, डॉक्टर, उद्योजकांकडून दहशत किंवा खंडणी मागणाऱ्यांवर कठोर कारवाई.
* अल्पवयीन मुलांना कामावर ठेवू नये; नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई.
* अमली पदार्थ, मोबाईल चोरी, संशयित टोळ्या व अतिक्रमणाविरोधात विशेष मोहीम.



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर शहरातील वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर व्यापारी, उद्योजक आणि नागरिकांना मोठा दिलासा देणारा निर्णय जाहीर करत अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांनी शहरात लवकरच 'बीट इंचार्ज' प्रणाली लागू करण्यात येणार असल्याची घोषणा केली. व्यापाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस प्रशासन पूर्णपणे कटिबद्ध असून, कोणत्याही दबावाखाली नव्हे तर केवळ कायद्याच्या चौकटीत काम केले जाईल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. तक्रार निवारण दिनानिमित्त आयोजित व्यापारी-उद्योजक संवाद बैठकीत त्यांनी शहरातील विविध व्यापारी संघटना, उद्योग प्रतिनिधी आणि लोकप्रतिनिधींशी सविस्तर चर्चा केली. यावेळी आमदार हेमंत ओगले, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, नगराध्यक्ष करण ससाणे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपअधीक्षक जयदत्त भंवर, पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांच्यासह विविध व्यापारी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीत व्यापाऱ्यांनी शहरातील वाढती गुन्हेगारी, अमली पदार्थांचा वाढता विळखा, एमआयडीसी परिसरातील अपुरी पोलीस गस्त, मोबाईल चोरी, वर्गणीच्या नावाखाली होणारी दहशत, अतिक्रमण, जॉगिंग ट्रॅकवरील संशयास्पद हालचाली, मोरगे वस्तीतील चोरीच्या घटना तसेच महाविद्यालयीन युवकांमध्ये वाढलेले ड्रग्जचे व्यसन यांसारख्या गंभीर प्रश्नांकडे पोलीस प्रशासनाचे लक्ष वेधले.यावर उत्तर देताना पोलीस अधीक्षक मुम्मका म्हणाले, व्यापारी वर्ग हा कोणत्याही शहराच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. व्यापाऱ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी आमची आहे. कोणीही दबाव आणत असेल, दहशत निर्माण करत असेल किंवा तक्रार नोंदवून घेतली जात नसेल तर थेट माझ्याशी संपर्क साधा. प्रत्येक तक्रारीवर कारवाई होईल.

शहरातील प्रत्येक भागाची जबाबदारी निश्चित करण्यासाठी बीट इंचार्ज प्रणाली लागू केली जाणार असून, औद्योगिक क्षेत्र, व्यापारी पेठा आणि संवेदनशील भागांवर विशेष लक्ष ठेवले जाणार आहे. शाळा सुरू होण्याच्या व सुटण्याच्या वेळेत विशेष पोलीस गस्त,

(उर्वरीत पान ४ वर)

# गांधीवादाचा अखेरचा पहारेकरी हरपला...!

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

डॉ. कुमार सप्तर्षी : संघर्ष, समाजकारण आणि गांधीवादाची चालती-बोलती शाळा महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीतील एक तेजस्वी विचारदीप अखेर काळाच्या पडद्याआड गेला. ज्येष्ठ समाजवादी नेते, गांधीवादी विचारवंत, 'युवक क्रांती दल' (युक्रांद)चे संस्थापक, महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष, माजी आमदार आणि सामाजिक परिवर्तनासाठी आयुष्य वेचलेले डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या निधनाने महाराष्ट्राने केवळ एक राजकीय व्यक्तिमत्त्व गमावलेले नाही, तर विवेक, संघर्ष, प्रबोधन आणि मूल्याधिष्ठित राजकारणाचा एक जिवंत आधारस्तंभ गमावला आहे.

आजच्या राजकारणात सत्तेच्या समीकरणांना, जाती-धर्माच्या ध्रुवीकरणाला आणि आर्थिक हितसंबंधांना जास्त महत्त्व दिले जात असताना डॉ. सप्तर्षी यांचे संपूर्ण आयुष्य या प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने वाहणारे होते. सत्ता नव्हे, तर समाजपरिवर्तन; पद नव्हे, तर प्रबोधन; लोकप्रियता नव्हे, तर लोकहित हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय राहिले.

डॉ. कुमार सप्तर्षी यांचा जन्म स्वातंत्र्योत्तर भारताच्या उभारणीच्या काळात झाला. वैद्यकीय शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी डॉक्टर म्हणून सुखवस्तू आयुष्य जगण्याचा मार्ग सहज निवडू शकला असता. मात्र, त्यांनी समाजातील विषमता, अन्याय आणि शोषणाविरोधात लढण्याचा मार्ग स्वीकारला. विद्यार्थी चळवळ, शेतकरी, कामगार, दलित, वंचित आणि बेरोजगार युवकांच्या प्रश्नांसाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या 'युवक क्रांती दल' (युक्रांद) ने महाराष्ट्रात विचारप्रधान आणि मूल्याधिष्ठित राजकारणाची नवी परंपरा निर्माण केली.

डॉ. सप्तर्षी यांच्या व्यक्तिमत्त्वाची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्यांची वैचारिक स्पष्टता. ते कोणत्याही पक्षाचे अंध समर्थक नव्हते आणि कोणाच्याही विरोधासाठी विरोध करणारेही नव्हते. योग्य तेव्हा सरकारचे कौतुक आणि चुकीच्या धोरणांवर कठोर टीका, ही त्यांची भूमिका कायम राहिली. त्यांनी लोकशाही, संविधान, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्याय या मूल्यांशी कधीही तडजोड केली नाही.

गांधी, जयप्रकाश नारायण, राम मनोहर लोहिया आणि समाजवादी विचारसरणीचा प्रभाव त्यांच्या कार्यात स्पष्टपणे दिसून येत होता. मात्र त्यांनी गांधीवादाला केवळ भाषणांपुरते मर्यादित ठेवले नाही. साधी राहणी, स्वच्छ सार्वजनिक जीवन, अहिंसेचा आग्रह, संवादातून प्रश्न सोडविण्याची भूमिका आणि सामाजिक सलोखा टिकविण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न, या सर्व गोष्टी त्यांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग होत्या.

विधानपरिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी सभागृहात मांडलेले प्रश्न हे केवळ राजकीय नव्हते; ते सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंब होते. शिक्षण, बेरोजगारी, ग्रामीण विकास, शेतकरी प्रश्न, भ्रष्टाचार, प्रशासनातील पारदर्शकता आणि लोकशाही संस्थांचे संरक्षण या विषयांवर त्यांनी सातत्याने आवाज उठविला. त्यांचे भाषण अभ्यासपूर्ण, तर्कशुद्ध आणि मूल्यांवर आधारित असे.

डॉ. सप्तर्षी यांचे आणखी एक महत्त्वाचे योगदान म्हणजे युवकांमध्ये विचारांची बीजे पेरणे. त्यांनी हजारो युवकांना सामाजिक बांधिलकी, विवेकशीलता आणि संविधानिक मूल्यांची प्रेरणा दिली. त्यांच्यासाठी राजकारण म्हणजे निवडणुका नव्हत्या, तर समाज बदलण्याचे प्रभावी माध्यम होते. त्यामुळेच अनेक पिढ्यांनी त्यांना मार्गदर्शक मानले.

आजचा काळ मात्र वेगळा आहे. समाजात वाढत चाललेली द्वेषाची भाषा, धार्मिक ध्रुवीकरण, सोशल मीडियावरील दिशाभूल, आर्थिक विषमता आणि राजकारणातील मूल्यांचा होत असलेला ऱ्हास ही गंभीर आव्हाने आहेत. अशा वेळी डॉ. कुमार सप्तर्षी यांच्यासारखा संयमी, अभ्यासू आणि विवेकवादी आवाज अधिक आवश्यक होता. त्यामुळे त्यांचे निधन ही केवळ एका व्यक्तीची हानी नसून महाराष्ट्राच्या वैचारिक विश्वाची मोठी पोकळी आहे.

त्यांच्या जाण्याने अनेक प्रश्न अनुत्तरित राहतात. त्यांच्या विचारांचा वारसा कोण पुढे नेणार? समाजवादी आणि पुरोगामी चळवळी नव्या पिढीपर्यंत पोहोचतील का? गांधीवादी मूल्ये पुन्हा सार्वजनिक जीवनाच्या केंद्रस्थानी येतील का? हे प्रश्न आता अधिक तीव्रतेने समोर उभे आहेत.

मात्र, व्यक्ती जाते; विचार अमर राहतात. डॉ. कुमार सप्तर्षी यांचे आयुष्य हे संघर्ष, प्रामाणिकपणा, सामाजिक बांधिलकी आणि मूल्यनिष्ठ सार्वजनिक जीवनाचा आदर्श आहे. त्यांनी दिलेला संदेश स्पष्ट आहे लोकशाही केवळ मतदानाने टिकत नाही; ती जागरूक नागरिक, विवेकशील समाज आणि सत्यासाठी संघर्ष करणाऱ्या व्यक्तींमुळे जिवंत राहते.

आज त्यांना खरी श्रद्धांजली म्हणजे त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे, संविधानिक मूल्यांचे रक्षण करणे, समाजात संवाद आणि सलोखा वाढविणे आणि राजकारणाला पुन्हा मूल्यांची दिशा देणे. कारण विचारांचा दीप विझत नाही; तो एका हातातून दुसऱ्या हातात जात राहतो. डॉ. कुमार सप्तर्षी यांनी पेटवलेली ही ज्योत महाराष्ट्राच्या सामाजिक आणि वैचारिक प्रवासाला पुढेही उजळत राहो, हीच त्मयांना भावपूर्ण श्रद्धांजली..!

# विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत नेतृत्वगुण व छंद जोपासावेत : पोलीस निरीक्षक आठरे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** ''विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासावरच लक्ष केंद्रित न करता आपल्या आवडीचे छंद जोपासावेत. शालेय जीवनात मिळणाऱ्या विविध संधींमुळे नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि कौशल्याला योग्य दिशा मिळते. नियमांचे पालन करून आदर्श नागरिक बनण्याचा संकल्प करा. प्रवरेचे संस्कार हे जबाबदार आणि सुसंस्कृत नागरिक घडविणारे आहेत. सहकाराच्या पवित्र भूमीत शिक्षण घेत असल्याचा प्रत्येक विद्यार्थ्याने अभिमान बाळगावा,'' असे प्रतिपादन लोणी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक युवराज आठरे यांनी केले.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरानगर येथील प्रवरा पब्लिक स्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी आयोजित प्रिफेक्ट इन्व्हेस्टिचर (विद्यार्थी पदाधिकारी पदग्रहण) समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मुख्य क्रीडा विद्यार्थी प्रतिनिधी संचित चंदन (स्पोर्ट्स प्रिफेक्ट), मुख्य क्रीडा विद्यार्थिनी, हाऊस प्रिफेक्ट, सांस्कृतिक प्रिफेक्ट तसेच विविध विद्यार्थी पदाधिकाऱ्यांना बॅज व सॅश प्रदान करण्यात आले.विद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. बी. अंबाडे यांनी नवनियुक्त विद्यार्थी पदाधिकाऱ्यांना शाळेची शिस्त, प्रामाणिकपणा, नेतृत्व, सेवाभाव आणि जबाबदारी यांचे प्रामाणिकपणे पालन करण्याची शपथ दिली.

यावेळी मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक युवराज आठरे म्हणाले, ''प्रवरेसारख्या संस्थेत शिक्षण घेण्याचे भाग्य प्रत्येकाला लाभत नाही. सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागात घडलेले परिवर्तन प्रेरणादायी आहे. या संस्थेत विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासोबत उत्तम संस्कारही दिले जातात. शालेय जीवनात मिळणाऱ्या नेतृत्वाच्या संधी भविष्यातील यशाचा पाया घालतात. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने या संधींचे सोने करत स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवावे.''

ते पुढे म्हणाले, ''आज सोशल मीडियाचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. त्याचा गैरवापर टाळून माहितीचे आदान-प्रदान, ज्ञानवृद्धी आणि स्वतःचे उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी मोबाईल व सोशल मीडियाचा सकारात्मक वापर करावा. शिस्त, जबाबदारी आणि सेवाभाव या मूल्यांच्या आधारेच यशस्वी आयुष्य घडते.''

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेले स्वागतगीत, मार्चपास्ट आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. शिक्षक, विद्यार्थी व पालकांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत समारंभ खास आकर्षण होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वेदांत विखे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या पर्यवेक्षिका जगधने, प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका रत्नपारखी, वस्तीगृह प्रमुख दिपक जाधव, शारीरिक शिक्षण संचालक अफजल पटेल तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. प्राचार्य डॉ. बी. बी. अंबाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.




# अल्पवयीन मुलीचे लग्न लावून छळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** अल्पवयीन मुलीचे वय लपवून तिचा विवाह लावून देत सासरी शारीरिक व मानसिक छळ केल्याचा धक्कादायक प्रकार राहुरी तालुक्यात उघडकीस आला आहे. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात पती, सासू, नणंद, विवाह जुळवून देणारा मध्यस्थ तसेच अन्य संबंधित अशा १२ ते १३ जणांविरुद्ध पोक्सो कायदा, बालविवाह प्रतिबंध कायदा आणि भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांत दाखल झालेल्या फिर्यादीनुसार, अहिल्यानगर येथील नागापूर परिसरातील १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विवाह ७ मे २०२६ रोजी राहुरी येथील राजवाडा परिसरातील एका तरुणासोबत तिच्या आईने मध्यस्थाच्या मदतीने लावून दिला. मुलगी अल्पवयीन असल्याची माहिती असतानाही नातेवाईक आणि दोन्ही कुटुंबीयांनी हा विवाह घडवून आणल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. विवाहानंतर मुलगी सासरी राहत असताना तिचा शारीरिक व मानसिक छळ करण्यात आल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. या त्रासाला कंटाळून तिने आईशी संपर्क साधला. त्यानंतर २९ मे २०२६ रोजी तिची आई मुलीला माहेरी घेऊन गेली.दरम्यान, या घटनेची माहिती मिळाल्यानंतर अहिल्यानगर येथील स्नेहालय संस्थेच्या 'उडाण' प्रकल्पाच्या कार्यकर्त्यांनी मुलीच्या वयाची खातरजमा करून वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली. त्यानंतर मुलीने संस्थेच्या कार्यकर्त्यांसमवेत १७ जुलै रोजी राहुरी पोलीस ठाण्यात लेखी फिर्याद दाखल केली.या फिर्यादीवरून गुन्हा रजिस्टर क्रमांक ८०१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेचे कलम ७४, ३५१(२), ३५२ तसेच पोक्सो कायद्याचे कलम ८ व १२ आणि बालविवाह प्रतिबंध कायदा, २००६ मधील कलम ९, १० व ११ अंतर्गत पती, सासू, नणंद, विवाह जुळवून देणारा मध्यस्थ व अन्य संबंधित अशा १२ ते १३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार तुळशीदास गिते करीत आहेत.

# संगमनेर-गुहा मार्गाची दुरवस्था

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** नगर-मनमाड आणि नाशिक-पुणे महामार्गांना जोडणाऱ्या संगमनेर-गुहा या सुमारे ५० किलोमीटरच्या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालक, शेतकरी, विद्यार्थी व नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

या मार्गावर शालेय विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ असून खड्ड्यांमुळे अनेक किरकोळ व गंभीर अपघात घडल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवून संपूर्ण मार्गाचे रुंदीकरण व डांबरीकरण करावे, तसेच दोन्ही बाजूंना दुचाकीस्वार व विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी डॉ. सुजय विखे पाटील प्रणित जनसेवा युवा मंच, झरेकाठीच्या वतीने करण्यात आली आहे.

लवकरच पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, आमदार अक्षय कर्डिले व आमदार प्राजक्त तनपुरे यांना निवेदन देण्यात येणार असून मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ डोळे व जनसेवा




# अल्पवयीन मुलगी गर्भवती, गुन्हा दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** येथील अल्पवयीन तरुणी पोट दुखत असल्याने मुंबई येथील एका रुग्णालयात गेली. तेथील डॉक्टरांनी तीला तपासून ती गर्भवती असल्याचे सांगीतले. खबर मिळताच मुंबई येथील पोलिसांनी राहुरी येथील एका तरुणा विरोधात गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल केले. एक अल्पवयीन तरुणी पाथर्डी तालुक्यात तीच्या कुटुंबासह राहत होती. सध्या तीचे वय १७ वर्षे ११ महिने आहे, तर आरोपी तरुण हा राहुरी तालुक्यातील सडे येथील रहिवाशी असून त्याचे वय २८ वर्षे आहे. पिडीत तरुणी व आरोपी तरुण यांचे नातेसंबंध असल्याने तरुणी आरोपी तरुणाच्या घरी येत जा करीत असे. रम्यान दोघांचे प्रेम संबंध जुळून आले. घरचे लग्न लावून देणार नाहीत म्हणुन दोघांनी राहुरी तालुक्यातील महादेव वाडी, सडे येथील महादेव मंदिरामध्ये दि. १६ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रेम विवाह केला होता. जानेवारी २०२६ मध्ये तरुणीच्या पोटामध्ये दुखत असल्याने तिच्या पतीने तिला राहुरी येथील एका खाजगी रुग्णालयात नेले असता दिड महिन्याची गरोदर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले होते. सदर तरूणीला तिची प्रसुती तिच्या सध्याच्या माहेरी मुंबईमध्ये करावयाची असल्यामुळे ती नाव नोंदणी करण्यासाठी दि. २६ जून २०२६ रोजी नौरोजी वाडीया मॅटर्निटी हॉस्पीटल, परळ, मुंबई या ठिकाणी गेली. तेथील डॉक्टरांनी ती सात महिन्यांची गर्भवती असल्याची माहिती तेथील पोलीस ठाण्यात दिली.

# महिलेचा विनयभंग ; चौघांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** बहिणीला मारहाण केल्याचा जाब विचारणाऱ्या दोघी बहीणींना शिवीगाळ दमदाटी करुन लोखंडी रॉडने मारहाण करण्यात आली. तसेच महिलेच्या अंगाला हात लावुन विनयभंग केल्याची घटना राहुरी शहर हद्दीत १५ जुलै रोजी दुपारच्या दरम्यान घडली. राहुरी शहरातील मुलनमाथा येथील एका विवाहित महिलेला तीचा पती, मुलगा व सुन नेहमी मारहाण करून त्रास देत असतात. या बाबत पिडीत महिलेच्या नातेवाईक असलेल्या दोन बहिनी दि. १५ जुलै २०२६ रोजी दुपारी २ वाजे दरम्यान राहुरी येथे आल्या. आणि त्यानी आरोपींना जाब विचारला. तेव्हा आरोपींनी त्या दोन्ही बहिनींना शिवीगाळ दमदाटी करुन लोखंडी रॉड व लाथा बूक्क्यांनी मारहाण केली. तसेच एका महिलेच्या अंगाला हात लावुन कपडे फाडले आणि विनयभंग केला.एका महिलेच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात आरोपी शोयब आयुब शेख, समरीन शोयब शेख, आईशा नाझीम शेख, अंजुम आसिफ शेख, सर्व रा. मूलनमाथा, राहुरी, यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.

# उक्कलगावात दिवसाढवळ्या वाळूची अवैध वाहतूक महसूलच्या भूमिकेवर संशयाची सुई?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील उक्कलगाव येथील प्रवरा नदीपात्रातून बैलगाड्यांच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणावर वाळूचे अनधिकृत उत्खनन आणि वाहतूक केली जात असल्याचे समोर आले आहे. प्रशासनाचे डोळे उघडे असतानाही दिवसाढवळ्या सुरू असलेल्या या अवैध धंद्यामुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. नदीपात्रातून सुरू असलेला वाळूचा अवैध उपसा तात्काळ थांबवावा, या मागणीसाठी उक्कलगावच्या काही ग्रामस्थांनी नुकतेच श्रीरामपूरचे तहसीलदार मिलिंद वाघ यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले आहे. मात्र, त्यानंतरही ठोस कारवाई न झाल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, दररोज अनेक बैलगाड्या वाळू भरून सर्रास ये-जा करतात. हा प्रकार काही दिवसांचा नसून गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने सुरू आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा सुरू असतानाही महसूल विभाग आणि स्थानिक यंत्रणेला याची माहिती नसावी, यावर लोकांचा विश्वास बसत नाही. यामुळे महसूल विभागाच्या निष्पक्षतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांचे वाळू तस्करांशी संगनमत असल्याच्या चर्चा आता गावात दबक्या आवाजात सुरू आहेत. निवडक किंवा देखाव्यापुरती केली जाणारी कारवाई या साऱ्या प्रकरणाला खतपाणी घालत असल्याचे ग्रामस्थांचे मत आहे. जर प्रशासन वेळीच जागे झाले नाही, तर भविष्यात नदीपात्राचे आणि पर्यावरणाचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. आता महसूल प्रशासन या प्रकरणी कठोर भूमिका घेते की 'जैसे थे' परिस्थिती कायम राहते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सात्रळ महाविद्यालयातील ९५ विद्यार्थ्यांना कॅम्पस मुलाखतीचा लाभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सात्रळ (ता. राहुरी) येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ट्रेनिंग प्लेसमेंट सेलच्या वतीने आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नामांकित बँकेच्या विविध पदांसाठी मुलाखती आयोजित करण्यात आल्या होत्या. यात एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक आणि ॲक्सिस बँक यांचा समावेश होता. सदर मुलाखती दरम्यान महाविद्यालयातील, प्रवरा परिसर तसेच विविध महाविद्यालयातून ९५ विद्यार्थी-विद्यार्थीनी सहभागी झाल्याची माहिती महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सोपान शिंगोटे



यांनी दिली. लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ना. डॉ. राधाकृष्ण विखे, माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के, शालिनीताई विखे, डॉ. सुजय विखे, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे, सहसचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, अतांत्रिक विभागाचे शिक्षण संचालक व प्राचार्य डॉ. प्रदीप दिघे यांनी सदर उपक्रमाचे कौतुक केले आहे. पंचक्रोशीतील युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाविद्यालयाचा प्लेसमेंट सेल, माजी विद्यार्थी, सर्व प्राध्यापक, प्रशासकीय व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी खूप खूप परिश्रम घेतले.

# द्रोणा अकॅडमी मध्ये विद्यार्थी नेतृत्वाला चालना

## विद्यार्थी मंत्रिमंडळाचा शपथविधी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा व विद्यार्थी दशेत विद्यार्थ्यांना लोकशाहीच्या मूल्यांची तत्त्वे आत्मसात व्हावीत यासाठी द्रोणा अकॅडमीच्या वतीने विद्यार्थी मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा नुकताच पार पडला .

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व सरस्वती पूजनेने करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष जयराज दंडवते, संचालिका प्राजक्ताताई दंडवते, उपाध्यक्ष अनुप दंडवते , प्राचार्या अनिता रोहोम ,शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. पाहुण्यांची ओळख अंर्जुमन खान यांनी करून दिली.

नव्याने निवड झालेल्या हेड बॉय इयत्ता दहावी चा विद्यार्थी समर्थ दिघे ,हेड गर्ल इयत्ता दहावीतील विद्यार्थिनी राजनंदिनी जाधव, हाऊस कॅप्टन , उपकर्णधार व विद्यार्थी प्रतिनिधींना बॅच व सॅश प्रदान करण्यात आले. त्याचबरोबर चार हाऊस पाडण्यात आले होते. रेड हाऊस (अग्नी), येल्लो हाऊस (वायु) ग्रीन हाऊस (पृथ्वी) ब्लू हाऊस (जल) या हाऊस मधील विद्यार्थ्यांना सुद्धा बॅच, कॅप,सॅश प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात




आला .विद्यार्थ्यांना त्यानंतर सर्व विद्यार्थी पदाधिकाऱ्यांनी शाळेच्या प्रगतीसाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याची शिस्त, जबाबदारी व सेवाभाव जपण्याची शपथ घेतली. अशा प्रकारचे समारंभ द्रोणा अकॅडमी मध्ये विद्यार्थ्यांची नेतृत्व जबाबदारी आणि संघभावना विकसित करण्यासाठी आयोजित केले जातात.

यावेळी प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना नेतृत्व म्हणजे केवळ पद नसून जबाबदारी असल्याचे सांगत प्रामाणिकपणे कर्तव्य पार पाडण्याचा संदेश दिला. संस्थेचे अध्यक्ष जयराज दंडवते यांनी विद्यार्थ्यांची अभिनंदन केली व उज्वल कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळेस विद्यार्थ्यांनी नेत्र दीपक असे तायक्वांदो प्रत्यक्षीक सादरीकरण केले. या विद्यार्थ्यांना द्रोणा अकॅडमीचे क्रीडा शिक्षक विकास सावंत यांचे विद्यार्थ्यांना तायक्वांदो मध्ये विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

सूत्रसंचालन कल्पना मोरे व सानवी भोंगळे यांनी केले. आभार वंदना सिंग व अनिल दिघे यांनी मानले.

# क्रिकेटचा अनभिषिक्त सम्राट :गॅरी सोबर्स

सर गॅरी सोबर्स, नाम ही काफी है!आमच्या पिढीने गॅरी बघितला, अनुभवला, हे आमचं भाग्य!अष्टपैलू म्हणजे काय, याचं उत्तर गॅरी सोबर्स हेच मिळेल. अशा ह्या महान खेळाडूचं काळाच्या पडद्याआड जाणं म्हणजे एका दैदीप्यमान पर्वाची अखेर ठरते २८ जुलै १९३६ रोजी बार्बाडोसमध्ये जन्मलेले गॅरी सोबर्स म्हणजे क्रिकेटविश्वला पडलेले रम्य आणि तितकेच दिव्य स्वप्नच म्हणावे लागेल. वेस्ट इंडिजचा हा महान क्रिकेटपटू म्हणजे दैवी देणगी लाभलेला किमयागार होता.

१९६० व ७० चे दशक हे क्रिकेटसाठी वेस्ट इंडिजच्या दादागिरीचे पर्व होते.वेस्ट इंडिजने ह्या काळात सातत्याने अधिराज्य गाजवले. यात गॅरी सोबर्स, वेलस्ली हॉल, रोहन कन्हाय, क्लाईव्ह लॉईड अशा दिग ज्जाचा समावेश होता. १९७० चा कालखंड हा कसोटी क्रिकेटचा सुवर्णकाळ मानला जातो. याच दशकाने सर गॅरी सोबर्स, सुनील गावास्कर, गुंडप्पा विश्वनाथ, बिशनसिंग बेदी, इरापल्ली प्रसन्ना, भागवत चंद्रशेखर, कपिलदेव,क्लाईव लॉईड, विव रिचर्ड, हॅडली, लिली, थॉमसन, बायकॉट यासारखे रत्न क्रिकेट क्षेत्राला दिले. ह्या हिऱ्यात गॅरी सोबर्स हे कोहिनूर होते.

१९६५ ते १९७२ या काळात त्यांनी वेस्ट इंडिजचे नेतृत्व केले. त्यांच्या नेतृत्वाखाली कॅरिबियन क्रिकेटला आत्मविश्वास, आक्रमकता आणि कलात्मकता यांचे नवे परिमाण लाभले. खेळाचे सौंदर्य जपणे, ही त्यांची ओळख होती.गॅरी म्हणजे चैतन्य होते. आक्रमकता हा त्यांचा स्थायीभाव असला तरी तो फक्त मैदानापूरताच होता. मैदानाबाहेर ते कमालीचे विनम्र व सज्जन गृहस्थ होते. सुनील गावास्कर व गुंडप्पा विश्वनाथ यांच्या फ्लदाजीचे कौतुक करताना ते राखून बोलायचे नाहीत.सुनील गावस्कर हा फालदाजीचा वस्तूपाठ तर विश्वनाथ म्हणजे स्वर्गीय सुख देणारा शिल्पकार अशा शब्दात ते कौतुक करीत. हेच मोठेपण गॅरी यांना महानपदी विराजमान करतं.

सन १९७५ मध्ये बि्रटिश सरकारने त्यांना 'सर' हा किताब बहाल केला. १९९८ मध्ये बार्बाडोसने त्यांना 'राष्ट्रीय नायक' म्हणून सर्वोच्च नागरी सन्मान दिला. पुढे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने वर्षातील सर्वोत्तम पुरुष क्रिकेटपटूसाठी दिल्या जाणाऱ्या पुरस्काराला 'सर गारफिल्ड सोबर्स ट्रॉफी' असे नाव देऊन त्यांच्या योगदानाला जागतिक मान्यता दिली. हे कोणत्याही क्रिकेटपटूसाठी अमरत्वाचे प्रतीक आहे.





वयाच्या सतराव्या वर्षी त्यांनी वेस्ट इंडिजकडून कसोटी पदार्पण केले. सुरुवातीला त्यांची निवड डावखुऱ्या फिरकी गोलंदाज म्हणून झाली; परंतु काळाच्या ओघात त्यांनी स्वतःला जगातील सर्वोत्तम फलंदाजांपैकी एक म्हणून घडवले. एवढ्यावरच ते थांबले नाहीत. डावखुरी वेगवान-मध्यमगती गोलंदाजी, पारंपरिक फिरकी आणि मनगटी फिरकी, या तिन्ही प्रकारांत ते तितक्याच सहजतेने गोलंदाजी करू लागले. क्रिकेटमध्ये असा सर्वसमावेशक खेळाडू पुन्हा जन्माला आला नाही, असे म्हटले जाते. पाकिस्तानविरुद्ध नाबाद ३६५ धावांची खेळी करून त्यांनी कसोटी क्रिकेटमधील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्येचा जागतिक विक्रम प्रस्थापित केला. हा विक्रम तब्बल छत्तीस वर्षे अबाधित राहिला. १९६८ मध्ये नॉटिंगहॅमशायरकडून खेळताना त्यांनी माल्कम नॅशच्या एका षटकात सलग सहा षटकार ठोकून प्रथम श्रेणी क्रिकेटच्या इतिहास रचला.

आजच्या सारखा तो काळ नव्हता. दोनचार वर्षातून कसोटी मालिका व्हायची. अशा काळात अवघ्या ९३ कसोटींमध्ये ८०३२ धावा, २६ शतके, २३५ बळी आणि १०९ झेल, ही आकडेवारी गॅरी सोबर्स यांच्या महानतेची साक्ष ठरते.त्यांची खरी ओळख होती ती, कोणत्याही परिस्थितीत संघासाठी आवश्यक ती भूमिका निभावण्याच्या अद्वितीय क्षमतेची.

सोबर्स यांच्या व्यक्तिमत्त्वात अहंकार नव्हता. आपल्या यशाचा कधीही गवगवा न करता, नवोदित खेळाडूंना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या तंत्रावर मार्गदर्शन करणे, हे काम त्यांनी आयुष्यभर केले. एका जिंदादिल क्रिकेटपटूच्या आयुष्याचा प्रवास आज थांबला. ग्राऊंडवर आग ओकणारा हा माणूस रियल लाईफमध्ये अतिशय शांत आणि सज्जन होता. डॉन ब्रॅडमन यांनी एकदा सोबर्स यांच्याबद्दल म्हटले होते की, ''तो पाच क्रिकेटपटूंच्या बरोबरीचा एकटा खेळाडू आहे.'' या एका वाक्यात त्यांच्या अष्टपैलुत्वाचे सार सामावलेय. समकालीन खेळाडू त्यांना किंग म्हणत! क्रिकेटचा राजा! अशा ह्या महान खेळाडूंचा खेळ बघण्याचं सौभाग्य १९७२ मध्ये ब्रेबॉन स्टेडियम, मुंबई येथे मला लाभले. अशा ह्या क्रिकेटच्या सम्राटास आणि महामानवास मनाचा मुजरा!

**– भास्कर खंडागळे**
**अध्यक्ष, श्रीरामपूर तालुका क्रिकेट असोसिएशन**

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## वैष्णवी देवी माता मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी भाविकांना सहकार्याचे आवाहन

**पुणतांबा :** पुणतांबा येथील जागृत वैष्णवी देवी माता मंदिराच्या जीर्णोद्धार व कळस बांधकामाचे काम सध्या सुरू असून या धार्मिक कार्यासाठी भाविकांनी आर्थिक सहकार्य करावे, असे आवाहन पंडित परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. सुमारे ३० वर्षांपूर्वी पंडित परिवाराने वैष्णवी देवी माता मंदिराची प्रतिष्ठापना करून मंदिराची उभारणी केली होती. सध्या मंदिराच्या जीर्णोद्धारासह कळस बांधकामाचे काम हाती घेण्यात आले आहे. मंदिर अधिक सुशोभित व भव्य स्वरूपात उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता असल्याने परिसरातील तसेच बाहेरगावी असलेल्या भाविकांनी आपल्या इच्छेनुसार आर्थिक मदत करून या पुण्यकार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन पंडित परिवाराने केले आहे. मंदिराच्या विकासासाठी भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

## ताईसाहेब कदम विद्यालयात मोफत गणवेश वाटप

**सोनई :** ताईसाहेब कदम कन्या विद्यालयात चालू शैक्षणिक वर्षाच्या निमित्ताने गुणवंत विद्यार्थिनी सत्कार आणि मोफत गणवेश वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एडीसीसी बँकेचे माजी व्यवस्थापक संजय दरंदले हे होते.तर मुख्य अतिथी म्हणून आदर्श माजी मुख्याध्यापिका, स्कूल कमिटी सदस्या आशाताई कर्डिले ह्या होत्या. प्रारभ दीप प्रज्वलनाने करून सरस्वती पूजन केले. मागील शैक्षणिक वर्षात इयत्ता दहावी मध्ये उत्कृष्ट गुण मिळवून शाळेचे नाव उज्वल करणाऱ्या गुणवंत विद्यार्थिनींचा पाहुण्यांच्या हस्ते रोख बक्षीस देऊन व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. प्रथम तीन क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींना आशाताई कर्डिले यांच्याकडून पाच हजार रुपयांचे बक्षीस व सोनई ग्रामपंचायत सदस्य सखाराम राशिनकर यांच्याकडूनही ५ हजार रुपयांचे बक्षीस रोख स्वरूपात विद्यार्थिनींना आज देण्यात आले. याच कार्यक्रमाचेऔचित्य साधून शाळेतील गरजू विद्यार्थिनींना ८३ मोफत गणवेशाचे वाटप करण्यात आले. विद्यालयाच्या माजी मुख्याध्यापिका यमुना इखे यांनी यशस्वी झालेल्या विद्यार्थिनींचे अभिनंदन करून कौतुक केले. व गरजवंत विद्यार्थिनींच्या गणवेशासाठी २१ हजार रुपयाची देणगी दिली व पुढील शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या.

## लाटे यांची शिवसेना उपजिल्हा प्रमुख निवड

**श्रीरामपूर :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे साहेब यांच्या आदेशाने शिर्डी लोकसभा मतदारसंघातील शिवसेना



पदाधिकाऱ्यांच्या नवीन नियुक्ती जाहीर करण्यात आल्या आहेत. गेल्या २४ वर्षापासून श्रीरामपूर राहुरी मतदार संघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे एकनिष्ठ व सैनिक सचिन लाटे तालुका उपाध्यक्ष पदावर काम करीत असताना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने जिल्हा संपर्क नेते संजय राऊत, संपर्कप्रमुख सुनील शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाप्रमुख जगदीश चौधरी सचिन कोते यांच्या नेतृत्वात अहिल्यानगर उत्तर उपजिल्हाप्रमुख पदी सचिन लाटे यांची निवड करण्यात आली.

# नागरी व मल्टीस्टेट पतसंस्थांच्या सुरक्षिततेसाठी कायद्यात सुधारणा करणार : मुख्यमंत्री फडणवीस

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राज्यातील नागरी सहकारी आणि मल्टीस्टेट सहकारी पतसंस्थांचे कामकाज अधिक पारदर्शक, सक्षम व सुरक्षित करण्यासाठी आवश्यक त्या कायदेशीर सुधारणा करण्यात येतील, अशी महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. महाराष्ट्रातील नागरी सहकारी व मल्टीस्टेट सहकारी पतसंस्थांच्या शिष्टमंडळाने मुंबई येथे मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली.

अहिल्यानगरचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील व मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या भेटीत महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे कार्याध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा (काका) कोयटे, राज्य मल्टीस्टेट फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश वाबळे, शिवाजीराव कपाळे, कडूभाऊ काळे, रवींद्र कानडे, जितेंद्र जैन, एस. एस. गडगे आदी उपस्थित होते.

बैठकीत पतसंस्थांसमोरील अडचणी, विद्यमान कायद्यांतील त्रुटी, ठेवीदार व सभासदांच्या हिताचे संरक्षण, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि पारदर्शकता वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा झाली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्य शासन सहकार क्षेत्र अधिक मजबूत करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगत आवश्यक कायदे बदल करण्याचे आश्वासन दिले.



केंद्र शासनाने स्थापन केलेल्या कायदा बदल समितीवर काका कोयटे यांची सदस्य म्हणून नियुक्ती झाल्याचा उल्लेख करत, त्यांनी मांडलेल्या सूचना गांभीर्याने विचारात घेतल्या जातील, असे मुख्यमंत्री म्हणाले. राज्य मल्टीस्टेट फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश वाबळे यांनी मांडलेल्या सूचनांवरही सकारात्मक भूमिका घेत केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्यासमवेत स्वतंत्र बैठक घेऊन पुढील कार्यवाही केली जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.

दरम्यान, दिल्ली येथे केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनाही मल्टीस्टेट पतसंस्थांच्या विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या बैठकीस सुरेश वाबळे, प्रवीण दरेकर, संजय भेंडे, काका कोयटे, कडूभाऊ काळे, शिवाजीराव कपाळे, जितेंद्र जैन, रवींद्र कानडे, सुकुमार पाटील, एस. एस. गडगे, एम. एल. चौगुले व शिवाजीराव ढोले आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांच्या घोषणेमुळे राज्यातील नागरी व मल्टीस्टेट सहकारी पतसंस्था क्षेत्रात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, अधिक सुरक्षित, सक्षम व पारदर्शक सहकार व्यवस्थेकडे वाटचाल होईल, असा विश्वास शिष्टमंडळाने व्यक्त केला.

# विठ्ठलवाडी बालवारकऱ्यांचा दिंडी सोहळा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील विठ्ठलवाडी जिल्हा परिषद शाळेच्या वतीने 'जय जय रामकृष्ण हरी, ज्ञानोबा माऊली तुकाराम च्या जय घोषात हाती टाळ - म्रुदुंग आणी खांद्यांवर भगव्या पताका घेत बाल वारकऱ्यांच्या वतीने दिंडी काढण्यात आली.चिमुकल्या वारक-यांमुळे विठ्ठलवाडी पुर्णपणे विठुमय झाली होती.



जिल्हा परीषद प्राथमिक शाळा विठ्ठलवाडी (ता.नेवासा) येथे शनिवारी १८ जुलै रोजी आयोजीत करण्यात आलेला बालवारकऱ्यांचा दिंडी सोहळा अत्यंत उत्साहात आणी भक्तीमय वातावरणात पार पडला. सकाळी ठीक ८.०० वाजता शाळेच्या मैदानावरून विठ्ठल रुक्मिणीच्या मुर्तीचे पुजन करून या दिंडी सोहळ्यास प्रारंभ करण्यात आला.

पारंपारीक वारकरी पोशाखात नटलेल्या बालचमू, डोक्यावर तुळशी वृंदावन घेतलेल्या विद्यार्थिनी आणी त्यांना साथ देणारे गावातील भजनी मंडळ आणी समस्त ग्रामस्थ बंधु - भगीणींनी या सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहुन चिमुकल्यांचा उत्साह वाढवला.

विठ्ठलवाडी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक राऊत सर व शिक्षीका कदम मॅडम यांच्या वतीने या दिंडीचे नियोजन करण्यात आले होते.यावेळी विष्णू शिरसाठ,मारूती तांदळे,राऊसाहेब तांदळे,रामराज्य ग्रुप चे विशाल कु-हे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलाचे प्रा. काळे यांना राज्यस्तरीय कबड्डी पुरस्कार

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा :** कबड्डी क्षेत्रातील तीन दशकांहून अधिक काळाच्या उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनच्या वतीने नेवासा फाटा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित श्री.दादासाहेब हरिभाऊ घाडगेपाटील विद्यालयाचे प्राचार्य सोपानराव काळे यांना उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते राज्यस्तरीय कबड्डी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सदर पुरस्कार हा अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

कबड्डी महर्षी बुवा साळवी यांच्या जयंतीनिमित्त व २६ व्या कबड्डी दिनाचे औचित्य साधून रत्नागिरी येथे राज्यस्तरीय कबड्डी पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. प्राचार्य सोपान काळे यांनी १९९५ मध्ये तेलकुडगाव येथे कबड्डी संघाची स्थापन केली. त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलात क्रीडा शिक्षक व नंतर प्राचार्य म्हणून त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर घडवले. कबड्डी बरोबरच खो-खो,कुस्ती,धावणे,आर्चरी,शुटिंग ,बॉक्सिंग, हॉलीबॉल या खेळातही त्यांचे मोठे योगदान आहे. प्राचार्य सोपानराव काळे यांना मिळालेल्या राज्यस्तरीय कबड्डी पुरस्काराबद्दल त्यांचे संस्थेच्या अध्यक्षा ड. सुमतीताई साहेबराव घाडगेपाटील,उपाध्यक्ष ड. स्नेहलताई चव्हाण,सहसचिव डॉ.श्रुती आमले,कार्यकारी अधिकारी डॉ. गौरव आमले,चेतन चव्हाण, अधिरथ पवार यांच्यासह सर्व विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# श्री जगन्नाथ रथयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** संगमनेर शहरात राजस्थानी ब्राह्मण उत्सव युवक-युवती समितीच्या वतीने श्री जगदीश जयंती व श्री जगन्नाथ रथोत्सव २०२६ निमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य श्री जगन्नाथ रथयात्रेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी आमदार अमोल खताळ यांनी प्रभू श्री जगन्नाथांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. तसेच नगरपरिषदेजवळ महायुतीच्या वतीने उभारलेल्या स्वागत मंचावर उपस्थित राहून रथयात्रेत सहभागी झालेल्या भाविकांचे स्वागत केले. शहरातील बाजारपेठेतील श्री जगदीश मंदिरापासून रथयात्रेला प्रारंभ झाला. यावेळी शुभम उपाध्ये, प्रितम खंडेलवाल, श्रेयस पंचारिया, ललित जोशी, ऋषिकेश बद्दर, रॅली प्रमुख लाला दायमा, तेजस ओझा, नीरज उपाध्ये, साई जोशी, वरुण ओझा तसेच युवती समितीच्या अध्यक्षा कोमल दायमा, शीतल जोशी, जयश्री असोपा, सचिव दीपाली बद्दर, पुनम दायमा स्नेहा साखी, प्राची जोशी यांच्यासह भाविक उपस्थित होते.

# राज्य सरकारकडून बांधकाम कामगारांच्या आर्थिक सहाय्यात वाढ

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** राज्यातील नोंदणीकृत बांधकाम कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या सामाजिक व आर्थिक सुरक्षिततेला अधिक बळकटी देण्यासाठी महायुती सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये सुधारणा करण्यात आली असून, लाभार्थींना मिळणाऱ्या आर्थिक सहाय्यतेत लक्षणीय वाढ करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील हजारो बांधकाम कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना थेट लाभ मिळणार असल्याची माहिती आ. अमोल खताळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

### शिक्षणासाठी विशेष आर्थिक सहाय्य

कामगारांच्या मुलांच्या शिक्षणालाही सरकारने विशेष प्राधान्य दिले आहे. इयत्ता नववी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना २० हजार, इयत्ता अकरावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना २५ हजार, वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमासाठी १ लाख, तर अभियांत्रिकी पदवीसाठी ६० हजार आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. तसेच परदेशात पदव्युत्तर अथवा पीएच.डी. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रम शुल्काची जबाबदारीही शासन उचलणार आहे.

### शालेय विद्यार्थ्यांनाही विविध सुविधा

याशिवाय इयत्ता पहिली ते आठवी पर्यंत शिकणाऱ्या पहिल्या दोन पाल्यांना मोफत शैक्षणिक साहित्य संच उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सैनिक शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संपूर्ण अभ्यासक्रम शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येईल. तसेच अनुदानित व विनाअनुदानित सैनिक शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी १० हजारांचे आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे.

### महिला कामगारांसाठी प्रसूती सहाय्य

महिला बांधकाम कामगारांसाठीही प्रसूती सहाय्य योजनेत मोठा दिलासा देण्यात आला आहे. पहिल्या दोन अपत्यांसाठी प्रत्येकी २५ हजारांचे एकरकमी आर्थिक सहाय्य देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

राज्य सरकारने कामगारांच्या सामाजिक सुरक्षिततेला प्राधान्य देत विविध योजनांच्या लाभांमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. नव्या निर्णयानुसार नोंदणीकृत बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसांना ३ लाख५० हजार अपघाती मृत्यू झाल्यास ६.लाख ५० हजार तर कायमस्वरूपी दिव्यांगत्व आल्यास २ लाखांचे आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. निवृत्तीवेतन योजनेतही महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आली असून, आवश्यक नोंदणी कालावधी पूर्ण केलेल्या कामगारांना १० वर्षे पूर्ण झाल्यास ६ हजार, १५ वर्षे पूर्ण झाल्यास ९ हजार, तर २० वर्षे पूर्ण झाल्यास १२ हजार प्रतिवर्षआर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. या निर्णयाबद्दल आ. खताळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्य मंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे आभार व्यक्त केले.

# एकाच रात्रीत बिबट्या जेरबंद; औरंगपूर परिसरातील नागरिकांना दिलासा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** संगमनेर तालुक्यातील औरंगपूर परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याच्या वावरामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुधीर गोपाळ गुंजाळ यांच्या गट क्रमांक २९४ मधील शेत परिसरात एक बिबट्या, एक बिबटीण व दोन बछडे अशा चार बिबट्यांचा वावर असल्याने ग्रामस्थ, शेतकरी तसेच शालेय विद्यार्थ्यांनी घराबाहेर पडणेही टाळले होते.

या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र आरगडे व ग्रामस्थांनी बिबट्यांना पकडण्यासाठी पिंजरा उपलब्ध करून देण्याची मागणी पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, युवा नेते डॉ. सुजय विखे पाटील



आणि वन विभागाकडे केली होती. त्यानुसार वन विभागाने शनिवारी पिंजरा उपलब्ध करून दिला. वन अधिकारी साळवे, पवार व डेंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली सायंकाळी पिंजरा लावण्यात आला. विशेष म्हणजे अवघ्या एका रात्रीत एक बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद करण्यात वन विभागाला यश आले. मात्र परिसरात आणखी तीन बिबट्यांचा वावर असल्याने वन विभागाने शोधमोहीम सुरू ठेवली आहे.

# मतदार यादी विशेष सखोल पुर्ननिरिक्षणाला वेग; राहुरीत आढावा बैठक

## बीएलओंच्या अनुपस्थितीवर मंत्री विखेंची नाराजी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**१११ :** राहुरी प्रतिनिधी राहरी मतदारसंघातील मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण आढावा बैठक काल शनिवार दि. १८ जुलै रोजी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

बैठकीत प्रशासनाच्या कामगिरीचा आढावा घेताना ५२ टक्के काम पूर्ण झाले असून अद्याप ४८ टक्के काम बाकी असल्याची माहिती प्रांताधिकारी किरण सावंत यांनी दिली. दुपार उशीरा पर्यंत बैठक सुरू होती.

या बैठकीत बीएलओंच्या वैधनामा मतदार संघस्तरीय बैठक अनुपस्थितीवरून पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाला खडसावले. बीएलओ जर घरोघरी जाऊन मतदारांची माहिती देत नसतील, फॉर्म भरत नसतील, तर संबंधित नागरिकांचे नाव मतदार यादीत राहणार नाही. ही गंभीर बाब असून बीएलओंनी जबाबदारीने आणि योग्य पद्धतीने काम करणे गरजेचे आहे, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

बैठकीला आ. प्राजक्त तनपुरे, आ. अक्षय कर्डिले, जिल्हा अध्यक्ष दिलीप भालसिंग, विनायक देशमुख, शामराव निमसे, उदयसिंह पाटील, दादा पाटील सोनवणे, अ‍ॅड. तान्हाजी धसाळ, सुकुमार पवार, मोहन पालवे, मुळा धरण अभियंता सायली पाटील, सुरसिंग पवार, सुभाष गायकवाड, प्रांताधिकारी किरण सावंत, तहसीलदार अमित पवार यांसह विविध विभागांचे शासकीय अधिकारी उपस्थित होते.

तसेच कार्यक्रमस्थळी सुरेश बानकर, आर.आर. तनपुरे, राजेंद्र उंडे, अमोल भनगडे, ज्ञानेश्वर बाचकर, सुरेश भुजाडी अनिल कासार, विराज धसाळ, बाळासाहेब उंडे, बबन गुलदगड, नंदकुमार डोळस, सुरेश निमसे, रामदास बाचकर, आरिफ शेख, राजेंद्र गायकवाड, राजेंद्र दरक, सतीश फुलसौंदर, नयन शिंगी आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत उर्वरित काम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देत, निवडणूक प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी प्रशासनाने अधिक जबाबदारीने काम करण्याचे निर्देश देण्यात आले.

# टाळ-मृदुंगाच्या गजरात बिहाणी विद्यालयाची दिंडी

## विद्यार्थ्यांच्या वेशभूषा व जनजागृती फलकांनी वेधले शहरवासीयांचे लक्ष



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त राहुरी येथील कै. लालाशेठ बिहाणी विद्यामंदिर प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी काढलेल्या भव्य दिंडी सोहळ्याने शहरात भक्तिमय वातावरण निर्माण केले. टाळ-मृदुंगाच्या गजरात, विठ्ठल-रुक्मिणीच्या वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थ्यांनी आणि पर्यावरण जनजागृतीच्या संदेशांनी सजलेल्या फलकांनी नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

कै. लालाशेठ बिहाणी विद्या मंदिर प्रशालेच्या वतीने इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी या दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यालयातून सुरू झालेली ही दिंडी शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत गोकुळ कॉलनी येथील आनंद ऋषीजी गार्डनमधील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरापर्यंत पोहोचली. दिंडीमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी वारकरी परंपरेचे दर्शन घडवत विविध पारंपरिक वेशभूषा परिधान केल्या होत्या.

विद्यार्थ्यांनी हातात भगवे झेंडे आणि पर्यावरण संवर्धनाचे संदेश देणारे फलक घेतले होते. झाडे लावा, झाडे जगवा, स्वच्छता हीच सेवा यांसारख्या संदेशांमधून समाजप्रबोधनाचा अनोखा प्रयत्न करण्यात आला. टाळ-मृदुंगाच्या निनादात विद्यार्थ्यांनी शहरातील प्रमुख चौकांमध्ये आकर्षक रिंगण सादर केले. या मनोवेधक सादरीकरणामुळे नागरिकांनी दिंडीचे उत्स्फूर्त स्वागत करत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

दिंडीतील विठ्ठल-रुक्मिणीच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. वारकरी संप्रदायातील भक्ती, संस्कार आणि सामाजिक जाणीव यांचा सुंदर संगम या दिंडीत पाहायला मिळाला. विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध सहभागामुळे संपूर्ण दिंडी सोहळा विशेष ठरला.


**जाहिर नोटीस**

निशाणी क्र.
दिनांक :- १७/०७/२०२६
नेमलेली तारीख २४/०८/२०२६

**अ‍ॅड. डि. के. चक्रनारायण**
**नेवासा कोर्ट**

**नेवासा येथील मे. जिल्हा न्यायाधिश २ यांचे कोर्टात**
**दिवाणी चौकशी अर्ज नं. ३५/२०२६**

**अर्जदार-** १) तन्मय गणेश शेटे, वय १४, धंदा शिक्षण अ.पा.क. अर्जदार नं. २ पुष्पा गणेश शेटे, २) पुष्पा गणेश शेटे वय ३७, धंदा शेती, दोघे रा. गिडेगाव, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर

**सा. वाले**
महाराष्ट्र सरकार

सदरचा अर्ज अर्जदार यांनी मायनर अ‍ॅण्ड गार्डीयन अ‍ॅक्ट कलम ८ प्रमाणे अज्ञानाचे नावावरील मिळकत विक्री करण्यास परवानगी मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. मौजे गिडेगाव, ता. नेवासा येथील गट नंबर ११९/२ पैकी ० हे ६५ आर आकार ०रु ८० पैसे येणे प्रमाणे शेत जमिन मिळकत. अर्जदार नं. १ तन्मय गणेश शेटे हा अज्ञान असुन अर्जदार नं.२ पुष्पा ही त्याची जनक आई असुन ती त्याचे संगोपन, पालनपोषण व शिक्षण अर्जदार नं.२ हिच करत आहे. सदरची मिळकत ही अर्जदार यांची खरेदी मालकीने विकत घेतलेली आहे. सदरची मिळकत ही अर्जदार तन्मय व सोहम दोन्ही अज्ञान मुलांच्या हितासाठी व भविष्याची तरतुदी म्हणून अज्ञान पालक आई पुष्पा गणेश शेटे हिने एकत्र हिंदू कुटुबाच्या मिळकतीमधील उत्पन्नातून विकत घेतलेली होती. अर्जदाराशिवाय सदर मिळकतीशी अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, मालकी सबंध नव्हता व नाही. तसेच अर्जदार नं.२ हिस मुलाचे शिक्षणाकडे, पालन पोषणाकडे, संगोपनाकडे लक्ष दयावे लागत असल्याने सदरची मिळकत वहित करणे, मेहनत मशागत करणे, अर्जदार नं.२ हिस जमत नाही. त्यामुळे अर्जदार यांनी सदरची मिळकत विक्री करुन दुसरीकडे सोयीस्कर ठिकाणी मिळकत विकत घेणे आहे. अर्जदार नं. १ हा अज्ञान असून त्यांचे संगोपन, पालणपोषण, शिक्षणाचा संपुर्ण खर्च अर्जदार नं. २ हीच करत आहे. अर्जदार नं. २ हिस अर्जदार नं. १ याचे नावे दुसरीकडे सोईस्कर शेत जमिन विकत घेण्याबाबतचा सौदा जमिन मालकाशी केलेला आहे व सदरचे जमिन मालकाला अर्जदार नं.२ हिने दि. १६/०६/२०२६ रोजी विसार पावती दस्त नंबर २६५/२०२६ अन्वये विसार देखील दिलेला आहे. सदर अर्जामध्ये नमुद केलेली मिळकत विक्री करुन दुसरीकडे सोयीस्कर जमिन घेणे अज्ञानाचे हिताचे व फायदयाचे आहे. अशी सर्व परिस्थिती असतांना अज्ञान अर्जदार नं. १ तन्मय गणेश शेटे अ. पा. क. पुष्पा गणेश शेटे यांचे नावावरील मिळकत मौजे गिडेगाव, ता. नेवासा येथील गट नंबर ११९/२ पैकी क्षेत्र ० हे ६५ आर, आकार ० रुपये ८० पैसे ही मिळकत विक्री करण्याची गरज निर्माण झालेली आहे. त्यामुळे अर्जात नमुद केलेली मिळकत ही विक्री करणे गरजेचे व आवश्यक झालेले आहे. सदर अर्जामध्ये नमुद केलेली मिळकत मौजे गिडेगाव, ता. नेवासा येथील गट नंबर ११९/२ पैकी क्षेत्र ० हे ६५ आर. आकार ० रुपये ८० पैसे ही मिळकत तिन्हाईत इसमा सोबत विक्री करण्याचा व्यवहार केलेला असुन दि. ०९/११/२०२३ रोजी साठेखत दस्त नंबर ६३७९/२०२३ व दि. १८/०६/२०२४ रोजी साठेखत दस्त नंबर ३५३२/२०२४ अन्वये रक्कम ही स्विकारलेली आहे. तसेच दि.०३/०६/२०२६ रोजी साठखेत दस्त नंबर ३१३२/२०२६ अन्वये साठेखताची रक्कम ही स्विकारलेली आहे. त्यानंतर अर्जदार हे दि. १९/०६/२०२६ रोजी मा. दुय्यम निबंधक कार्यालयात खरेदी विक्री साठी गेले असता व चौकशी केली असता मा. दुय्यम निबंधक साहेब, नेवासा यांनी मे. कोर्टाची परवानगी आणल्याशिवाय खरेदीखत नोंदविण्यास नकार दिलेला आहे. म्हणून सदरचा अर्ज अर्जदार यांनी केलेला आहे. ज्याअर्थी सदरील वादा संबंधी कुणाचे काही म्हणणे असेल किंवा कोणाची काही हरकत असेल तर या जाहिर नोटीस प्रसिध्द तारखेपासून दि.२८/०८/२०२६ रोजी पर्यंत प्रसिध्द तारखेपासुन एक महिन्याचे आत या न्यायालयात स्वतः अगर वकिलामार्फत सर्व कागदपत्रानीशी उपस्थित राहावे. उपस्थित रहाण्यास कसूर केल्यास सदरील अर्जाची चौकशी होऊन अर्जदाराचा पुरावा घेऊन योग्य तो हुकूम केला जाईल. याची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०७/२०२६ रोजी आमच्या सहीनिशी व न्यायालयाच्याशिक्यानिशी दिले असे.

शिक्का

**वरिष्ठ लिपिक**
**जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय**

**हुकूमावरुन**
**सही/-**
**अधिक्षक**
**जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय,**

## पान १ वरुन

### सोनम वांगचुक यांना बळजबरी हटवले!

विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित प्रश्न उपस्थित करणाऱ्यांना अशा प्रकारे हटवणे चुकीचे आहे, असे म्हटले. तर सत्ताधारी बाजूकडून पोलिसांची कारवाई न्यायालयाच्या निर्देशांनुसार आणि वांगचुक यांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठीच करण्यात आल्याचे स्पष्टीकरण देण्यात आले.

### जप्त वाळूचे घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाटप

या अंतर्गत हरेगाव ग्रामपंचायतीतील लाभार्थ्यांना ११० ब्रास, दत्तनगर ग्रामपंचायतीतील लाभार्थ्यांना १५२ ब्रास आणि खानापूर ग्रामपंचायतीतील लाभार्थ्यांना ३५ ब्रास, अशी एकूण २९७ ब्रास वाळूचे वाटप करण्यात आले आहे. याबाबत ग्राम महसूल अधिकारी भामाठाण व खानापूर यांनी सादर केलेल्या अहवालाच्या आधारे ही कार्यवाही करण्यात आली असून, शासनाच्या घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना वेळेत बांधकामासाठी आवश्यक वाळू उपलब्ध झाल्याने त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. याबाबतची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयास अहवालाद्वारे कळविण्यात आल्याचे तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांनी सांगितले.

### अश्लील शिव्या, अपशब्द फौजदारी कायद्यानुसार अश्लील नाहीत!

जमिनीच्या वादादरम्यान झालेल्या भांडणात मादर** आणि सन ऑफ अ*व्होर यांसारखे अपमानास्पद शब्द वापरल्याप्रकरणी अश्लीलतेच्या आरोपाखाली दोषी ठरविण्यात आलेल्या आरोपीच्या बाजूने निर्णय दिला. याप्रकरणातील आरोपी, मणी याने दाखल केलेले अपील अंशतः मंजूर करताना न्यायालयाने हे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले आहे.याप्रकरणी न्यायालयाने म्हटले की, कायद्याच्या दृष्टीने 'अश्लीलता' आणि 'असभ्यपणा', 'शिवीगाळ' किंवा 'अश्लाघ्य भाषा' या समान संकल्पना नाहीत, हे स्पष्ट केले पाहिजे. केवळ शिवीगाळ, अपशब्द किंवा असभ्य भाषा वापरली म्हणून ती कायद्याच्या अर्थाने 'अश्लील' ठरत नाही. शिवीगाळ वाटणारे असे शब्द कितीही अप्रिय, असंस्कृत किंवा आक्षेपार्ह वाटले तरी त्यांना अश्लीलतेच्या चौकटीत बसवता येत नाही. केवळ घाणेरडे किंवा अपमानास्पद शब्द ऐकून एखाद्याला किळस, संताप, तिरस्कार किंवा धक्का बसू शकतो. मात्र, त्या कारणास्तव ते शब्द कायद्याच्या दृष्टीने अश्लील ठरत नाहीत., असे न्यायालयाने स्पष्ट शब्दात सांगितले. मात्र, तक्रारदाराच्या नाकाच्या हाडाला कोयत्याने फ्रॅक्चर केल्याचा युक्तिवाद मान्य करत मणी यास गंभीर दुखापत केल्याप्रकरणी दोषी ठरविण्याचा निर्णय न्यायालयाने कायम ठेवला. तसेच, न्यायालय उठेपर्यंतचा साधा कारावास अशी त्याची शिक्षा कमी करण्यात आली. तसेच, त्याला ५० हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे.

### श्रीरामपूरला सुरक्षिततेची नवी ढाल..!

एमआयडीसीमध्ये नियमित दिवस-रात्र पेट्रोलिंग, ११२ हेल्पलाईनद्वारे तातडीची मदत, तसेच दुकानदारांनी दुकानात दर्जेदार सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, असे आवाहनही त्यांनी केले. आमदार हेमंत ओगले यांनी पोलीस प्रशासनाच्या अलीकडील कारवाईचे स्वागत करत रेल्वे स्थानक, एसटी स्थानक व इतर संवेदनशील ठिकाणी कायमस्वरूपी पोलीस तपासणी नाके उभारण्याची मागणी केली. व्यापाऱ्यांनीही शहरातील कायदा-सुव्यवस्था मजबूत करण्यासाठी पोलीस प्रशासनाशी समन्वय ठेवण्याची तयारी दर्शविली.

### दोन्ही हाताचे पंजे तोडणाऱ्या चौघांना पैठणमध्ये पकडले

आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता त्यांना सात दिवसांची पोलीस कोठडी मंजूर करण्यात आली आहे. हल्ल्यामागील कट, वापरलेली शस्त्रे आणि इतर सहभागींबाबत आता सखोल चौकशी होणार आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबुर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुजीतकुमार क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश अहिरे व श्रीगोंदा पोलीस पथकाने ही कारवाई यशस्वी केली.

# राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जयहरी माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे यांचा आषाढी वारी पायी दिंडीत सहभागी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

नेवासा : श्री क्षेत्र पंढरपूरला विठूरायांच्या भेटीसाठी पाऊले चालती पंढरीची वाट''आणि हातात टाळ घेत विठ्ठल नामाचा गजर करत आषाढी वारी पायी दिंडी सोहळ्यात दरवर्षी प्रमाणे यंदाही नेवासा तालुक्याचे माजी आमदार व राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाळासाहेब मुरकुटे हे आषाढी वारीसाठी श्रीक्षेत्र पंढरपुर पायी दिंडी सोहळ्यात सहभागी झालेले असून त्यांचे हे पायी दिंडी सोहळ्यातील २२ वे वर्ष आहे

वारकरी संप्रदायामध्ये प्रत्येक वारकरी व नागरिकांसह बाळासाहेब मुरकुटे यांची 'जयहरी' आमदार म्हणून अख्या राज्यात वेगळी ओळख झालेली आहे त्यांच्या आमदारकीच्या कार्यकाळात ते त्यांच्या नावापेक्षा 'जयहरी' नावानेच ते राज्यात प्रसिद्ध झालेले होते आणि ते आमदार असतांना त्यांनी कधी पायी वारी सोडलेली नसल्यामुळे अख्खा वारकरी संप्रदाय त्यांच्याकडे मोठ्या कुतूहलाने नेहमीच पहात असतो अशी वेगळी ओळख त्यांनी या पायी वारी दिंडी सोहळ्यामुळे राज्यात निर्माण केलेली आहे.

राज्यात चांगुलपणाचा मोठा 'आव' आणून नेहमीच एकमेकांवर राजकीय आखाड्यात कुरघोड्या करण्यात गुंग असणारी काही राजकारणी मंडळी आपण नेहमीच सर्वत्र पाहत असतांना मात्र राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे याला अपवाद असून ते दरवर्षी पायी वारी दिंडी सोहळ्यात नित्यनियमाने सहभागी होत असतात, एक वारकरी



संप्रदायातील निस्सिम सेवेकरी एक वारकरी म्हणून माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे यांच्याकडे पाहिले जात असल्यामुळे त्यांनी त्यांची वेगळीच ओळख राज्यात निर्माण केलेली आहे.

# प्रा.डॉ.आबासाहेब कसबे समाजरत्न पुरस्काराने सन्मानित



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** येथील सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार प्रा.डॉ.आबासाहेब कसबे यांना राष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी समिती छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून सामाजिक, पत्रकारिता क्षेत्रातील वाटचालीचा गौरव म्हणून समाजरत्न पुरस्कार सहाय्यक उपायुक्त सागर देशमुख, राज्य परिवहन अधिकारी लता जाधव (पोलीस निरीक्षक), सैय्यद साबेर (संस्थापक - राष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी समिती), मोहम्मद अखिल अहमद (संस्थापक सचिव) यांच्या हस्ते भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र, छत्रपती संभाजीनगर येथे( दि .१७ जुलै रोजी) देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांचे वैजापूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष डॉ दिनेश परदेशी, वैजापूर तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल संत, जिल्हा परिषद सदस्य पंकज ठोंबरे, गटविकास अधिकारी एच आर बोयनर, वैजापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत त्रिभुवन, रविराज कसबे,गटशिक्षणाधिकारी मनिष दिवेकर, शाहिर अशोक बागुल, अण्णासाहेब ठेंगडे, दिलीप अनर्थे, प्रमोद पठारे, विलास त्रिभुवन, कुलदीप नरवडे,साहेबराव पडवळ, विलास म्हस्के, गणेश बोर्डे, दत्तात्रय गायकवाड, मेजर सारंग सोमासे, कैलास दिवेकर यांनी अभिनंदन केले आहे

# दिंडी सोहळ्यात चोख बंदोबस्त

## ज्येष्ठ नागरिक संघटनेच्यावतीने पोलीस अधीक्षकांचा सत्कार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** पंढरपूरला अहिल्यानगरहुन जाणाऱ्या आषाढी वारी दिंड्यासाठी दिंडी मार्गावर चोख पोलीस बंदोबस्त ठेवल्याबद्दल ज्येष्ठ नागरिक संघटनेचे वतीने वसंतराव मुठे जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन यांचा सत्कार केला.श्रीरामपूर येथे शहरातील सद्य स्थितीवर नागरिक संवाद बैठकिसाठी जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आले असता.बैठक आटोपल्यावर श्रीरामपूर तालुका पोलीस पाटील संघटनेचे माजी व ज्येष्ठ नागरिक संघटनेचे विद्यमान अध्यक्ष वसंतराव मुठे व त्यांच्या सहकाऱ्यांनी श्रीक्षेत्र पंढरपूर पायी पालखी सोहळ्यावर सविस्तर चर्चा केली.अहिल्यानगर शहरातून संभाजीनगर ,मनमाड, कल्याण रोडने आगमन होणाऱ्या दिंड्या शहरातून पंढरपुरच्या दिशेने बाहेर पडतात. या आठवड्यात जेवढ्या दिंड्या शहराबाहेर पडल्या त्या सर्व दिंडी चालक व वारकऱ्यांनी पोलीसांचे आभार मानले. चोख बंदोबस्तात वाहतुकीचे उत्कृष्ट नियोजन करत पोलीस विभागाचे वतीने दिंडयाचे स्वागत करण्यात आल्याने वारकऱ्यांनी जिल्हा पोलीस प्रमुखांना धन्यवाद दिले. या सत्कार प्रसंगी वसंतराव मुठे समवेत ज्येष्ठ पत्रकार नागेश सामंत,बी आर चेडे,एम आय डि सी अध्यक्ष बाबासाहेब काळे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ बाबुराव उपाध्ये उपस्थित होते.




# एसआयआर डिजिटायझेशन कामकाजाबाबत आढावा बैठक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुका डिजिटायझेशनमध्ये पिछाडीवर असल्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री पंकजजी आशिया यांच्या प्रमुख उपस्थितीत नेवासा तालुक्यातील सर्व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांची तहसील कार्यालयात एस आय आर डिजिटायझेशन कामकाजाबाबत आढावा बैठक घेण्यात आली.पुढील दोन दिवसात पंधरा टक्के वाढ करण्याचे सक्त निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिलेले आहेत.

नेवासा तालुका डिजिटायझेशन मध्ये पिछाडीवर असल्यामुळे सद्या आवरेज गती ५५ टक्के आहे व नेवासा तालुक्याची डिजिटायझेशन टक्केवारी ४२ टक्के आहे.

त्यामुळे बीएलओ व बीएलओ सुपरवायझर यांनी कामाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे व कामामध्ये अपेक्षित प्रगती साधावी अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल

असा इशारा जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी यावेळी बोलतांना दिला. सदर बैठकीच्या प्रसंगी नेवासा तालुक्याचे तहसीलदार डॉ. संजय बिरादार, अप्पर तहसीलदार सोनाली मात्रे, निवासी नायब तहसीलदार चांगदेव बोरुडे,संदीप चिंतामनी, सहायक अभियंता प्रविण दहातोंडे, सहायक अभियंता आनंद रूपनर, शाखा अभियंता जितेंद्र कावळे, संतोष बांगर, इंजिनिअर शंकर ओहोळ यांच्यासह नेवासा तालुक्यातील सर्व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी उपस्थित होते.



## पाहिजेत

पुणतांबा (ता. राहाता ) येथील स्वामी विवेकानंद पतसंस्थेत त्वरित पदे भरणे आहेत. शाखाधिकारी एक, कॉशियर एक, क्लार्क एक, असे कर्मचारी त्वरित भरावयाचे आहे. तरी अनुभव असलेल्या इच्छूक उमेदवारांनी (दि.२७) जुलै २०२६ पर्यंत बाजारपेठ रोड पुणतांबा (ता. राहाता) येथील या संस्थेत इच्छूकांनी संपर्क साधावा.

# हजारो वारकऱ्यांना वैद्यकीय साहित्याची भेट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :**श्री संत ज्ञानेश्वर पालखी सोहळ्यातील हजारो वारकऱ्यांना हभप देविदास महाराज म्हस्के, यांच्या उपस्थितीत पंढरपूरकडे प्रस्थान झाल्यानंतर पायी चाललेल्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी वारकऱ्यातील वारकऱ्यांना आरोग्याच्या हितासाठी सर्वांच्या सहकार्य यांनी वैद्यकीय साहित्याची भेट स्व. तुकाराम पाटील गडाख यांच्या प्रेरणेतून युवा नेते रविराज पाटील गडाख व हनुमान ग्रामीण शिक्षक मंडळाचे पानसवाडी सचिव अध्यक्ष जयश्री ताई गडाख यांच्या उपस्थितीत भेट देण्यात आली.

प्रारंभी हभप देविदास महाराज म्हस्के यांचे रविराज पाटील गडाख व जयश्रीताई गडाख यांनी संत पूजन करून त्यांचा सन्मान केला. यावेळी जालिंदर वाकचौरे, जगन्नाथ भगत, विजयराव सदाफळ, संजय चेमटे, शिक्षक अशोक दराडे, माजी मुख्यध्यापक भाऊसाहेब खेस्मालस्कर, विजय खोसे आदी उपस्थित होते.



# कबड्डी दिनानिमित्त टाकळीभानमध्ये मुलींना क्रीडा साहित्याचे वाटप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

टाकळीभान । क्रीडा क्षेत्रात मुलींनाही उज्ज्वल करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध असून सातत्यपूर्ण मेहनत आणि जिद्दीच्या बळावर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळविता येते, असे प्रतिपादन सौ. आरतीताई गाढे यांनी केले. कबड्डी दिनानिमित्त आझाद क्रीडा मंडळाच्या वतीने न्यू इंग्लिश स्कूलच्या मैदानावर आयोजित कार्यक्रमात मुलींना क्रीडा साहित्याचे किट वाटप करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या.



'कबड्डी महर्षी' स्व. शंकरराव (बुवा) साळवी यांच्या जयंतीनिमित्त राज्यभर साजऱ्या होणाऱ्या कबड्डी दिनाचे औचित्य साधून हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाला प्रगतशील शेतकरी तुळशीदास उंडे, पत्रकार दिलीप लोखंडे, अर्जुन राऊत, मेजर विनोद रणनवरे, क्रीडा प्रशिक्षक रवींद्र गाढे, विश्व धावपटू भाऊसाहेब गव्हाणे, ज्येष्ठ कबड्डीपटू विजय साळवे, विकास साळवे, माया साळवे, सुमन साळवे आदी उपस्थित होते.टाकळीभानने असलम इनामदार, शिवम पटारे, सौरभ राऊत, अजित पवार यांसारखे नामवंत कबड्डीपटू राज्य व देशाला दिले असून गावाची कबड्डी क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण झाली आहे. आझाद क्रीडा मंडळ आणि ओन्ली साई क्रीडा मंडळ नवोदित खेळाडूंना सातत्याने मार्गदर्शन करून त्यांना प्रोत्साहन देत आहेत. अनेक खेळाडूंनी क्रीडा क्षेत्रातून शासकीय सेवेतही स्थान मिळविले आहे. यावेळी शिवम पटारे व सौरभ राऊत यांचा गौरव करण्यात आला. मार्गदर्शक रवींद्र गाढे यांनी नवोदित खेळाडूंनी चिकाटीने सराव करून क्रीडा क्षेत्रातील संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. कार्यक्रमास ग्रामस्थ, क्रीडाप्रेमी युवक व आझाद क्रीडा मंडळाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निधन वार्ता

### विजय पांडे



**शिर्डी :** येथील ज्येष्ठ पत्रकार बाबुराव पाटणी यांचे मोठे जावई व मुंबईतील बोरिवली येथील रहिवासी विजय नंदलाल पांडे यांचे शुक्रवारी (दि. १७ जुलै) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली असा मोठा परिवार आहे. ते शिर्डी येथील ज्येष्ठ पत्रकार सुदेश पाटणी यांचे मेहुणे होत.

### अनिल पांडे



**श्रीरामपूर** येथील जैन समाजातील व श्री चिंतामणी ट्रेडर्स, श्रीरामपूर चे मालक अनिल नेमीचंद पांडे (भारमवाला) (वय ६८) यांचे आज पहाटे ३.३० वा. अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, एक मुलगा, दोन मुली, सुन, पुतणे, जावई, नातवंडे, असा परिवार आहे. नंदलाल पांडे यांचे ते बंधू, विशाल, राहुल पांडे यांचे काका, श्री चिंतामणी ट्रेडर्सचे मालक ऋषिकेश पांडे यांचे वडील होते.

# टाकळीभान येथे आज सर्व रोग निदान शिबिर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** ना. राधाकृष्ण विखे पा. यांच्या विशेष प्रयत्नातून प्रवरा मेडीकल ट्रस्ट, तसेच नानासाहेब पवार प्रतिष्ठाण व विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, टाकळीभान व ग्रामपंचायत टाकळीभान यांचे संयुक्त विद्यमाने मोफत सर्व रोग निदान व उपचार शिबीर आज रविवार दि. १९ जुलै रोजी सकाळी ९ ते दु. १ वा. प्राथमिक जिल्हा परिषद शाळा या ठिकाणी आयोजित केले आहे या शिबिरामध्ये मोफत तज्ञ डॉक्टरकडून तपासणी, मोफत,गोळ्या-औषध मोफत शास्त्रक्रिया तसेच आयुष्यमान भारत कार्ड काढून मिळेल. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील प्रवरा ग्रामीण रुग्णालय, लोणी येथे करण्यात येईल, तरी गरजुंनी या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा'' असे आवाहन नानासाहेब पवार मित्र मंडळ, टाकळीभान सेवा संस्थेचे माजी चेअरमन मंजाबापू थोरात , चेअरमन राहुल पटारे,उपसरपंच कान्हा खंडागळे युवा नेते भाऊसाहेब पवार यांच्या वतीने करण्यात येत आहे

# जिनिंग-प्रेसिंग प्रकल्प लवकरच सुरू होणार : अरुण तनपुरे

## शेतकऱ्यांचा कापूस थेट खरेदी करण्याचा निर्धार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** अनेक वर्षांपासून बंद असलेला कापूस जिनिंग-प्रेसिंग प्रकल्प पुन्हा सुरू करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याबरोबरच तालुक्याचे हरवलेले औद्योगिक वैभव परत मिळविण्याचा संकल्प राहुरी कृषी उत्पन्न बाजार समितीने केला आहे. प्रकल्पाच्या आधुनिकीकरणाची कामे अंतिम टप्प्यात असून लवकरच हा प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार असल्याची माहिती बाजार समितीचे सभापती अरुण तनपुरे यांनी दिली.

अरुण तनपुरे यांनी सांगितले की, प्रकल्प सुरू झाल्यानंतर तालुक्यातील शेतकऱ्यांकडून उत्पादित होणारा कापूस थेट याः केंद्रावर खरेदी करण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध होण्याबरोबरच वाहतूक खर्च आणि दलालीचा भार कमी होणार आहे.

प्रकल्पासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून अत्याधुनिक १८ डीआर जिनिंग मशिनरी खरेदी करण्यात आली आहे. याशिवाय संस्थेच्या परिसरात भव्य प्रवेशद्वर उभारण्यात आले असून आठ गाड्यांच्या क्षमतेचे बेल प्रेसिंग युनिट, १०० टन क्षमतेचा भुईकाटा, तसेच सुमारे कोटी २५ लाख रुपये खर्चाचे सेल हाऊस उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. बाजार समितीच्या मालकीच्या विस्तीर्ण जागेवर विविध विकासकामे हाती घेण्यात आली असून तीही पूर्णत्वाकडे वाटचाल करत आहेत. विशेष म्हणजे ही सर्व कामे कोणत्याही वित्तीय संस्थेकडून कर्ज न घेता स्वनिधीतून केली जात असल्याचे तनपुरे यांनी स्पष्ट केले.



प्रकल्प सुरू झाल्यानंतर सुमारे १०० अडते आणि १५० कामगारांना थेट रोजगार उपलब्ध होणार असून ग्रामीण भागातील रोजगारनिर्मितीला मोठी चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ते पुढे म्हणाले की, राहुरी कृषी उत्पन्न बाजार समितीने गेल्या काही वर्षांत विकासाभिमुख कामांवर भर दिला आहे. बाजार समितीचे मुख्य कार्यालय आधुनिक सुविधांनी सुसज्ज करण्यात आले असून शेतकरी आणि व्यापाऱ्यांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

राहुरी तालुक्यातील सहकार क्षेत्राचे सुवर्णयुग माजी आ. डॉ. बाबुराव तनपुरे यांच्या काळात पाहायला मिळाले. राहुरी कारखाना, मुळा धरण, कृषी विद्यापीठ, सूतगिरणी, जिनिंग-प्रेसिंग प्रकल्प, लघुउद्योग संस्था आणि विविध सहकारी संस्था यशस्वीपणे कार्यरत होत्या. मात्र, कालांतराने राजकीय घडामोडी आणि अन्य कारणांमुळे अनेक संस्था बंद पडल्या.

या पार्श्वभूमीवर बंद पडलेला जिनिंग - प्रेसिंग प्रकल्प आणि तनपुरे कारखाना पुन्हा सुरू करण्यासाठी संचालक मंडळ कटिबद्ध असल्याचे सभापती अरुण तनपुरे यांनी सांगितले. तालुक्याचे औद्योगिक आणि सहकारी वैभव पुन्हा उभे करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असून त्यातून शेतकरी, व्यापारी आणि कामगारांना मोठा फायदा होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या कामासाठी बाजार समितीचे उपसभापती बाचकर, मुख्य सचिव भिकादास जरे, सर्व संचालक मंडळ तसेच अधिकारी आणि कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभत असल्याचेही तनपुरे यांनी नमूद केले.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

रविवार दि .१९ जुलै २०२६

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | सिंगल ५-१-९ मजबुत | जोड |
|---|---|---|---|
| १६० २५० ७०० | ७-४ | १३० १४९ ४०० | ७६-१४-३२-८०-४५ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | सिंगल ९-४-५ मजबुत | जोड |
|---|---|---|---|
| १२० ६७० ५८० | ३-६ | १२३ २६८ ६०० | ३२-०८-१४-७५-६९ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | सिंगल ४-७-९ मजबुत | जोड |
|---|---|---|---|
| १४० २३० ३८० | ५-८ | १२५ २६० ४४० | ५१-२८-३४-७९-८० |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |

# द • ख • ल

## क्रांती दिनी उपवर्गीकरणाविरोधात बौद्ध समाजाचा एल्गार



**अहिल्यानगर :** अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरण, संविधानविरोधी धोरणे आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत होणाऱ्या अपमानास्पद वक्तव्यांच्या निषेधार्थ ९ ऑगस्ट क्रांती दिनी भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात येणार असल्याची घोषणा स्वाभिमानी आंबेडकरी चळवळ व बौद्ध समाजाच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा अवमान करणाऱ्या आणि समाजात तेढ निर्माण करणाऱ्या प्रवृत्तींना जशास तसे उत्तर दिले जाईल. तसेच संविधान बचाव, सामाजिक ऐक्य आणि अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरणाच्या धोरणाविरोधात हा मोर्चा काढण्यात येणार आहे. यावेळी न्यायालयीन बंदर समितीचा अहवाल मुख्यमंत्री यांनी तातडीने सार्वजनिक करावा, अशी मागणी करण्यात आली. अनुसूचित जातींतील ५९ जातींमध्ये फूट पाडण्याचे कटकारस्थान भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित घटकांकडून उपवर्गीकरणाच्या माध्यमातून रचले जात असल्याचा आरोपही करण्यात आला. आरक्षणातील १३ टक्के हक्क कमी करण्याचा आणि संविधानात बदल घडवून आणण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा दावा यावेळी करण्यात आला.

## शिष्यवृत्ती परीक्षेत श्री समर्थ प्रशालेची देदिप्यमान कामगिरी




**अहिल्यानगर :** फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल आणि गुणवत्ता यादी नुकतीच जाहीर झाली. या परीक्षेत श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत गुणवत्ता यादीत मानाचे स्थान मिळवले. या यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रशालेत शालेय समिती चेअरमन मा. ड .श्री किशोरजी देशपांडे सर, तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी शिक्षक व शिक्षकेतर सहकारी यांनी अभिनंदन व कौतुक केले. याप्रसंगी शालेय समितीचे चेअरमन ॲड.श्री. देशपांडे, मुख्याध्यापिका वसुधा जोशी मॅडम, पर्यवेक्षक एल. कुलकर्णी, इयत्ता आठवीचे मार्गदर्शक शिक्षक शास्त्री मॅडम, श्री. पथवे, मेलगर मॅडम, तसेच इयत्ता पाचवीच्या मार्गदर्शक शिक्षिका प्रियंका कासार, चैताली गोरे, संकेत शिंदे उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या यशामागे त्यांच्या सातत्यपूर्ण अभ्यासाबरोबरच शिक्षकांचे नियोजनबद्ध मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य महत्त्वाचे असल्याचे उपस्थित मान्यवरांनी नमूद केले.

## राशीन - बारामती महामार्गावर रास्ता रोको आंदोलन



**राशीन :** सौर ऊर्जा प्रकल्पासाठी खेड उपकेंद्रा-पर्यंत टाकण्यात येणाऱ्या विद्युत पोल वाहिनीच्या कामावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने केवळ चार पोल उभारण्याची व क्रॉसिंगची परवानगी दिली असताना प्रत्यक्षात ३०० हून अधिक पोल उभारण्यात आल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिक व शेतकरी तसेच आंदोलन करते हनुमंत सुळ व बहुजन समाज पक्षाचे राशीन शहराध्यक्ष अनिल भाऊ लष्करे व बाधीत शेतकऱ्यांनी केला आहे. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता कृष्णा ठाकरे यांनी आंदोलन करते शेतकऱ्यांना सांगितले की , २७ जुलै पर्यंत वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तुमच्या सर्व मागण्या सोडण्यात येतील . व तो पर्यंत रॅमसम सोलर प्लॅन्ट प्राइवेट लिमिटेड कंपनीने राशीन बारामती राजमार्गावरील पोल रोवण्याचे कामकाज बंद ठेवले जाईल .असे आश्वासन दिल्यानंतर शेतकऱ्यांनी एक तासानंतर रास्ता रोको आंदोलन मागे घेतले. आंदोलनामध्ये शेतकरी हनुमंत सूळ, अनिल लष्करे, कैलास कायगुडे, श्रीकांत सायकर, डॉ. विलास राऊत, सचिन काळे, मयूर सुळ, शफी सय्यद, हनुमंत भांडवलकर, नवनाथ सुळ, नवनाथ सायकर, वाल्मीक सायकर, सचिन चव्हाण, यांच्यासह शेतकरी आंदोलन करते सहभागी झाले होते.

## संत शिरोमणी जनार्दन स्वामी महाराज पालखी सोहळ्याचे स्वागत




**अहिल्यानगर :** आषाढी वारीनिमित्त भायगाव (ता. वैजापूर) ते पंढरपूर असा प्रवास करणाऱ्या श्री संत शिरोमणी जनार्दन स्वामी महाराज पायी दिंडी पालखी सोहळ्याचे अहिल्यानगर शहरात आगमन होताच गवांदे परिवार व गवांदे क्लासच्या वतीने भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. टाळ-मृदुंगाच्या गजरात, संत माऊली, तुकाराम आणि विठुरायाच्या नामघोषात परिसर भक्तिमय झाला. यावेळी वारकऱ्यांसाठी आरोग्य तपासणी, मोफत औषधोपचार, कीर्तन सेवा आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ह.भ.प. विक्रम महाराज निंबवीकर म्हणाले की, वारकरी संप्रदायाला महाराष्ट्रात शेकडो वर्षांची उज्ज्वल परंपरा लाभली असून त्यातून समाजात धार्मिकता, समता आणि संस्कृतीचे जतन करण्याचे कार्य झाले आहे. वारकरी स्वतःच्या स्वार्थासाठी पंढरपूरला जात नाहीत, तर संपूर्ण समाजाच्या कल्याणासाठी आणि सुख-समृद्धीसाठी विठ्ठलाच्या चरणी साकडे घालतात. ते पुढे म्हणाले की, गवांदे क्लास शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करत असून चांगली आणि सुसंस्कृत पिढी घडविण्याचे काम करीत आहे. शिक्षणाबरोबरच धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा जपण्याचे कार्यही गवांदे परिवार गेल्या १५ वर्षांपासून सातत्याने करीत आहे. वारकऱ्यांसाठी आरोग्य तपासणी, मोफत औषध वाटप आणि महाप्रसादाचे आयोजन करून समाजाप्रती आपली बांधिलकी जपली आहे.

# ‘वांगचुक’ आंदोलन चिरडणारे मोदी सरकार डरपोक : काळे

### नजीकच्या काळामध्ये भारताचा नेपाळ झाल्याशिवाय राहणार नाही

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** नीट पेपर फुटी नंतर तब्बल वीस पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. २१ जूनला झालेल्या फेर परीक्षेकडे तब्बल पावणेदोन लाख विद्यार्थ्यांनी नैराश्यातून पाठ फिरवली. देशातील तरुणाईच्या भवितव्याच्या सुरक्षिततेसाठी राजकारण विरहित राष्ट्रीय स्तरावरच आंदोलन दिल्लीमध्ये वैज्ञानिक तथा शिक्षण तज्ज्ञ सोनम वांगचुक, अभिजीत दिपके यांच्यासह हजारो तरुणांनी उभं केलं आहे. त्यांच्या आमरण उपोषणाचा एकविसावा दिवस होता. मात्र आंदोलन चिरडण्यासाठी त्यांना जोर जबरदस्तीने उचलून नेत रुग्णालयात डांबण्यात आले आहे. वांगचुक यांना जबरदस्तीने उचलून नेणार मोदी सरकार हे डरपोक असल्याची टीका ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केली आहे.



केंद्र सरकारच्या या कृतीमुळे देशभरामध्ये संतापाची लाट उसळली आहे. काळे म्हणाले, देशात लोकशाही उरलेली नाही. मागच्या वीस दिवसात सरकारचा एकही प्रतिनिधी साधा फिरकला सुद्धा नाही. आंदोलकांशी संवाद साधण्या ऐवजी दडपशाही केली जात आहे. तरुणाईचा आवाज बनलेले अभिजीत दिपके यांना झालेली मारहाण, आंदोलन स्थळी युवती आंदोलकांशी केलेले गैरवर्तन, विद्यार्थ्यांवर केलेला लाठीचार्ज यातून देशामध्ये नवा हिटलर जन्माला आला आहे हेच सिद्ध होते. सरकारची हीच भूमिका कायम राहिली तर नजीकच्या काळामध्ये भारताचा नेपाळ झाल्याशिवाय राहणार नाही. हा वनवा आता सरकार रोखू शकत नाही. सरकारच्या या दडपशाहीचा आम्ही तमाम अहिल्यानगरकर आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने तीव्र निषेध करतो.

**आंदोलन राजकारण विरहितच रहावे :**

तरुणाईच्या भवितव्याच्या संरक्षणासाठी उभे राहिलेले हे आंदोलन राजकारण विरहित आहे. ते तसेच राहणे आवश्यक आहे. वांगचुक यांना मागील दोन दिवसांपासून देशभरातून प्रचंड मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत आहे. तरुणाई, नागरिक स्वयंस्फूर्तीने रस्त्यावर उतरत आहेत. अहिल्यानगर शहरात देखील शुक्रवारी सायंकाळी शेकडो विद्यार्थी, विद्यार्थिनी, सजक नागरिकांनी काढलेला कॅन्डल मार्च समाजाची यावर असणारी तीव्र भावना व्यक्त करणारा आहे. या आंदोलनाला आम्ही ठाकरे शिवसेनेच्या वतीने पाठिंबा दिला आहेच. परंतु राजकीय नेते, कार्यकर्ते यांच्यापेक्षा सर्वसामान्य नागरिकांनीच या आंदोलनाचा चेहरा व्हावे, असे आमचे स्पष्ट मत आहे. अहिल्यानगरसह देशात ठिणगी पडली आहे. आता हा वनवा सरकार रोखू शकत नाही, असे किरण काळे यांनी म्हटले आहे.

**मोदी सरकार असंवेदनशील:**

नैतिकतेच्या मुद्द्यावरून यापूर्वी अनेक मंत्र्यांनी राजीनामा दिल्याची उदाहरण आहेत. रेल्वे अपघातात शेकडो नागरिकांचा बळी गेला म्हणून तत्कालीन रेल्वेमंत्री लालबहादूर शास्त्री, एलआयसी घोटाळ्याच्या मुद्द्यावरून तत्कालीन अर्थमंत्री कृष्णमाचारी, भारत-चीन युद्धाच्या पराभवाची नैतिक जबाबदारी स्वीकारून तत्कालीन संरक्षण मंत्री के. कृष्ण मेनन यांच्या सह अनेक मंत्र्यांनी राजीनामा दिल्याची उदाहरण आहेत.

## लोकसहभागाशिवाय कोणतीही चळवळ यशस्वी होत नाही : आ. जगताप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** हरित, स्वच्छ आणि सुंदर शहर घडविण्याच्या उद्देशाने वाडिया पार्क-टिळक रोड मार्गावरील दुभाजकांमध्ये लोकसहभागातून तब्बल एक हजार बोगनवेल वृक्षांची लागवड करण्यात आली. या वृक्षांना भविष्यात विविध रंगांची फुले येणार असल्याने संपूर्ण टिळक रोड परिसर आकर्षक आणि नयनरम्य होणार असून शहराच्या सुशोभीकरणात भर पडणार आहे.

या वृक्षारोपण उपक्रमाचे उद्घाटन आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेवक सुरेश बनसोडे, उपक्रमाचे प्रमुख संयोजक गोरख पडोळे, नगरसेवक दत्ता गाडळकर, वैभव जगताप चैतन्य घुले, संयम शेटीया, संजय कडूस, कांतीसेठ पटेल, तुषार मुथा, परेश दिवाणी, जेठासेठ पटेल, पुरुषोत्तम पटेल, हंसराज पटेल, निलेश पटेल, नरसीभाई पटेल, जगदीश पटेल, लालाशेठ पटेल, राकेश सोनीमंडलेचा, अमित बुरा, प्रीतम तोडकर, हिरा खूबचंदानी, अरुण जाधव, दिलीप जाधव, अतुल जाधव, सिद्धांत जाधव, अक्षय गाडळकर, विकी कानडे, गौरव शेरकर, मनीष फुलडाळे, संतोष टेके, संजय जंजाळे, धीरज पडोळे, अशोक गाडळकर, कुमार गाडळकर, किरण कानडे, रितेश कानडे, सोमनाथ कानडे, नंदू एकाडे, दिनेश टेकाडे, नितीन एकाडे, विशाल एकाडे, सखाराम जाधव, सचिन दळवी, मनोज लाटे, पोपट निमसे, स्वप्निल घुले, राजू पाचरणे, बाबू पाचरणे, बाबासाहेब गाडळकर, विजय फुगारे, केतन गुंदेचा, संजय पडोळे, गणेश गाडळकर, गोरक्ष पडोळे, केतन गुंदेचा यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ते पुढे म्हणाले की, लोकसहभागाशिवाय कोणतीही चळवळ यशस्वी होऊ शकत नाही. अहिल्यानगरमध्ये वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाची लोकचळवळ सर्वप्रथम माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी सुरू केली. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी या उपक्रमाला गती दिली आणि आता महापालिकेचे उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी ‘ग्रीन सिटी’ मोहिमेच्या माध्यमातून हरित शहर उभारण्याचा संकल्प हाती घेतला आहे. त्याच चळवळीचा भाग म्हणून गोरख पडोळे यांनी पुढाकार घेत नागरिकांना एकत्र आणून हा उपक्रम यशस्वी केला आहे.

## महाविद्यालयात श्रीदत्त दिंडीचे स्वागत

**अहिल्यानगर :** निंबळक येथून पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या श्रीदत्त दिंडी सोहळ्याचे न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयात अत्यंत भक्तिभावाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. वारकऱ्यांच्या टाळ-मृदंगाच्या गजराने आणि विठ्ठलनामाच्या अखंड जयघोषाने महाविद्यालय परिसर भक्तिमय झाला होता. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रा. संजय जाजगे यांनी दिंडी परंपरेची ऐतिहासिक व आध्यात्मिक पार्श्वभूमी उलगडून सांगत वारकरी संप्रदायाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक योगदानावर प्रकाश टाकला. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे म्हणाले की, विठ्ठलभक्त वारकऱ्यांच्या आगमनामुळे महाविद्यालयाचे वातावरण भक्तिरसाने भारावून गेले असून, या पवित्र सोहळ्याचा साक्षीदार होण्याचे भाग्य आम्हाला लाभले आहे. यावेळी ह.भ.प. संदीप कळसे महाराज यांनी महाविद्यालयाने दिलेल्या आत्मीय सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

## डॉक्टरांवरील हल्ल्यांविरोधात आयएमएचा निषेध

### २० जुलैला लाक्षणिक संप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** डोंबिवली महानगरपालिका रुग्णालयात डॉक्टरांवर झालेल्या मारहाणीच्या घटनेने वैद्यकीय क्षेत्रात संतापाची लाट उसळली आहे. डॉक्टरांवरील वाढत्या हल्ल्यांना चाप लावण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय संघटनेने पुकारलेल्या लाक्षणिक संपाला आयएमए, अहिल्यानगर शाखेने पाठिंबा दिला आहे. त्याच्या निषेधार्थ २० जुलै रोजी सकाळी ६ वाजल्यापासून २४ तासांचा लाक्षणिक संप करण्यात येणार असल्याची माहिती आयएमएचे अध्यक्ष डॉ. धनंजय कुलकर्णी व सचिव डॉ. अमित करडे यांनी दिली.



या संपाच्या काळात सर्व बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) तसेच नियोजित शस्त्रक्रिया बंद राहणार आहेत. मात्र, रुग्णांच्या जीविताशी संबंधित तातडीची व अत्यावश्यक रुग्णसेवा सुरू ठेवण्यात येणार आहे. डॉक्टरांवरील हल्ले कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाहीत, असा स्पष्ट संदेश या आंदोलनातून देण्यात येणार आहे.

डॉक्टर व वैद्यकीय कर्मचाऱ्यांना सुरक्षित वातावरणात सेवा बजावता यावी, यासाठी शासनाने कठोर पावले उचलण्याची गरज आहे. डॉक्टरांवरील हल्ल्यांविरोधात वैद्यकीय क्षेत्रातील सर्व घटकांनी एकजुटीने उभे राहावे, असे आवाहन डॉ. धनंजय कुलकर्णी व डॉ. अमित करडे यांनी केले आहे.

## कौडगाव ग्रामस्थांकडून बीएलओ रमेश कर्पे यांचा सन्मान




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात आलेल्या विशेष संक्षिप्त मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेत उत्कृष्ट कामगिरी तसेच शंभर टक्के काम पूर्ण केल्याबद्दल मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) तथा ग्रामपंचायत कर्मचारी रमेश दिगंबर कर्पे यांचा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते गौरव करण्यात आला होता. या यशाबद्दल कौडगाव ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करून गौरव करण्यात आला. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभर विशेष संक्षिप्त पुनरीक्षण मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली. पात्र नागरिकांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे, चुकीच्या नोंदी दुरुस्त करणे, मतदार यादी अद्ययावत ठेवणे तसेच शंभर टक्के अचूक आणि पारदर्शक मतदार यादी तयार करण्यासाठी बीएलओंनी महत्त्वाची भूमिका बजावली. या मोहिमेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या बीएलओंचा जिल्हास्तरावर गौरव करण्यात आला असून त्यामध्ये रमेश दिगंबर कर्पे यांचा समावेश आहे.

रमेश कर्पे हे दिव्यांग असून एका पायाने पूर्णता: अपंग आहेत.मात्र त्यांनी येणाऱ्या अडचणींवर मात करत प्रत्येक मतदाराची माहिती अद्यावत केली.

या सोहळ्यासाठी युवासेना जिल्हा उपप्रमुख तथा ग्रा.पं.सदस्य सोमनाथ कांडके, कौडगाव जांब ग्राम पंचायत सदस्य तथा खेडे गाव विकास संघटना अहिल्यानगर जिल्हाअध्यक्ष बाबासाहेब धिवर, माजी उपसरपंच दत्तात्रय पवार, प्रकाश खर्से, संतोष कोहक, दत्तात्रय इंगुले, नितीन साठे, नागेश कदम, युवराज पेरणे, राम परभणे, सूर्यभान जाधव, पोपट खर्से, सुनील टांगळ, मुबारक शेख, गणेश खर्से ग्रामस्थ उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी समाजाने एकत्र येणे गरजेचे : इंजि. कोक्कुल

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** सामाजिक बांधिलकी जपत गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बळ देण्याच्या उद्देशाने पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने श्री मार्कंडेय शैक्षणिक संकुल येथे शहरातील विविध शाळांमधील १५० विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वाटप करण्यात आले. फाउंडेशनच्या या उपक्रमाचे यंदाचे दहावे वर्ष असून गेल्या दशकभरात तब्बल १,५०० विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वाटप करून शिक्षणासाठी मोलाची मदत करण्यात आली आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून इंजि. प्रशांत कोक्कुल, इंजि. अक्षय बल्लाळ, अमित सुंकी, गणेश अवधूत, बाबासाहेब तिपुले, राजू कोडम उपस्थित होते. तसेच पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टचे अध्यक्ष गणेश लकशेट्टी, सचिव अजयकुमार लयचेट्टी, उपाध्यक्ष श्रीनिवास बुरगुल, राजेंद्र बुलबुले, वरद लकशेट्टी, ओंकार आडेप, ओंकार जेटला यांच्यासह ट्रस्टचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वाटप करण्यात आले. प्रमुख पाहुणे इंजि. प्रशांत कोक्कुल यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या हातात शालेय दप्तर देणे म्हणजे केवळ शैक्षणिक साहित्याचे वाटप नव्हे, तर त्यांच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी करण्याचे काम आहे. आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये, यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने आपल्या परीने योगदान देणे आवश्यक आहे. पद्मशाली सोशल फाउंडेशनने गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने राबविलेला हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

## नव्या पोस्ट ऑफिसचे पोस्टमास्टर जनरल यांच्या हस्ते उद्घाटन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** भारतीय डाक विभागाच्या वतीने नागरिकांना अधिक सुलभ, जलद, आधुनिक व दर्जेदार टपाल तसेच वित्तीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हा न्यायालय परिसर, अहिल्यानगर येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या जिल्हा न्यायालय पोस्ट ऑफिसचे उद्घाटन सौ. प्रीती अग्रवाल (खझेड), पोस्टमास्टर जनरल, पुणे क्षेत्र, पुणे यांच्या शुभहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या उद्घाटन समारंभास मा. श्री. एस. बी. कचरे, प्रधान जिल्हा व सत्र



न्यायाधीश, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर तसेच मा. डॉ. दिलीप टिपरसे, उपपोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. याशिवाय न्यायालयातील न्यायिक अधिकारी, विविध विभागांचे अधिकारी, बार असोसिएशनचे पदाधिकारी, अधिवक्ते, न्यायालयीन कर्मचारी, भारतीय डाक विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर नव्याने सुरू करण्यात आलेल्या पोस्ट ऑफिसची पाहणी करण्यात आली. मान्यवरांनी पोस्ट ऑफिसमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या आधुनिक सुविधा, ग्राहकाभिमुख सेवा तसेच नागरिकांच्या सोयीसाठी करण्यात आलेल्या व्यवस्थेचे कौतुक केले.

# ४० वर्षांच्या सेवेनंतरही अपंग शिपायाचा छळ?

### निंबळक विद्यालयाच्या अध्यक्ष-सहसचिवांविरोधात शिक्षणाधिकाऱ्यांकडे तक्रार

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** तालुक्यातील इसळक-निंबळक येथील माध्यमिक विद्यालयातील कर्मचारी दत्तात्रय सोजीबा मुठे यांनी संस्थेचे अध्यक्ष नितीन भाऊसाहेब कोतकर आणि सहसचिव अविनाश भाऊसाहेब कोतकर यांच्याकडून मानसिक व शारीरिक छळ केला जात असल्याचा गंभीर आरोप करत माध्यमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार, दत्तात्रय मुठे हे गेली सुमारे ४० वर्षे विद्यालयात प्रामाणिकपणे सेवा बजावत असून जानेवारी २०२६ पासून अध्यक्ष व सहसचिवांकडून त्यांना सातत्याने त्रास दिला जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. ६ जून २०२४ रोजी मुख्याध्यापक कार्यालयाचे कुलूप तोडल्याप्रकरणी दाखल झालेल्या पोलीस तक्रारीत आपण साक्षीदार असल्याने आपल्यावर दबाव टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला. यासाठी वारंवार कारणे दाखवा नोटिसा बजावून मानसिक त्रास दिल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

मुठे यांनी आपल्या तक्रारीत नमूद केले आहे की, सेवाकाळात प्रामाणिकपणे काम करूनही त्यांना अपमानास्पद वागणूक देण्यात आली, बदनामी करण्यात आली तसेच कामकाजात अडथळे निर्माण करण्यात आले. प्रयोगशाळा परिचारक पदाच्या पदोन्नतीसाठी पैशांची मागणी करण्यात आली होती. पैसे देण्यास नकार दिल्यानंतर पदोन्नती मुद्दाम रोखण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

याशिवाय पत्नीच्या वैद्यकीय बिलास मंजुरी मिळवून देण्यासाठी २५ हजार रुपये दिल्याचा तसेच वरिष्ठ वेतन श्रेणी मंजूर करण्यासाठी १२ हजार रुपये घेतल्याचा गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. निवृत्तीसाठी अवघे काही महिने शिल्लक असताना अनावश्यक नोटिसा देऊन मानसिक छळ केला जात असून, निवृत्तीविषयक कागदपत्रांमध्ये अडथळे निर्माण केले जात असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. सेवानिवृत्तीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी एक ते दोन लाख रुपयांची मागणी होत असल्याचाही आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

शिपाई व नाईक कर्मचाऱ्यांना रात्रीची ड्युटी देण्याबाबत शासनाचा कोणताही निर्णय नसतानाही जाणीवपूर्वक नाईट ड्युटी लावण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोपही मुठे यांनी केला आहे.

या सर्व प्रकारामुळे आपल्या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून काम करणे कठीण झाले असल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे. संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर शालेय शिक्षण विभागाच्या नियमांनुसार तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क कायद्यानुसार योग्य ती कारवाई करावी. तसेच भविष्यात कोणताही त्रास होऊ नये यासाठी संरक्षण देण्यात यावे, अशी मागणी त्यांनी माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांकडे केली आहे.

# करडे गावात मध्यरात्री पिस्तुलातून तीन राऊंड फायर तरुणाच्या खुनाचा प्रयत्न, सात जणांविरोधात गुन्हा

## सराईत गुन्हेगारांचा गावात सशस्त्र धुडगूस; शिरुर पोलिसांच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**रांजणगाव गणपती :** शिरुर तालुक्यातील करडे गावात मध्यरात्रीच्या सुमारास पिस्तुलातून थेट तीन राऊंड फायर करून एका तरुणाचा खून करण्याचा प्रयत्न झाल्याची अत्यंत गंभीर घटना समोर आली आहे. जुन्या भांडणाच्या कारणावरून सात जणांच्या टोळक्याने बेकायदा जमाव जमवून शिवीगाळ व दमदाटी करत जीवे मारण्याच्या उद्देशाने गोळीबार केल्याची फिर्याद शिरूर पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणातील काही संशयित आरोपींविरोधात यापूर्वी खुनाचा प्रयत्न, दरोडा, खंडणी, मारहाण आणि बेकायदा शस्त्र बाळगल्यासारखे गंभीर गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांच्या नोंदीतून स्पष्ट होत आहे. तर काहींच्या विरोधात प्रतिबंधक कारवाईचे प्रस्ताव आणि चॅप्टर केसही दाखल आहेत. तरीही संबंधित व्यक्ती पिस्तुलासह गावात येऊन गोळीबार करण्याइतपत मोकाट कशा फिरत होत्या, हा गंभीर प्रश्न या घटनेनंतर उपस्थित झाला आहे. हि घटना शनिवार दि. १८ जुलै २०२६ पहाटे सुमारे १.३० वाजण्याच्या सुमारास करडे येथील हनुमान मंदिराच्या पाठीमागे, भैरवनाथ मंदिराजवळ, स्मशानभूमीशेजारील तळ्याजवळ घडली. या प्रकरणी निखील सतीश थेउरकर, (वय २३), रा. दौंडे वस्ती, करडे, ता. शिरुर, जि.पुणे याने शिरुर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. शिरुर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार जुन्या भांडणाच्या कारणावरून आरोपींनी तीन दुचाकींवरून करडे येथील हनुमान मंदिराच्या पाठीमागे, भैरवनाथ मंदिराजवळ येत बेकायदा जमाव जमविला. त्यानंतर फिर्यादीला शिवीगाळ व दमदाटी करून जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्याच्या दिशेने पिस्तुलातून एकूण तीन राऊंड फायर करण्यात आले. परंतु सुदैवाने या गोळीबारात फिर्यादी जखमी झाला नाही. मात्र भरवस्तीच्या परिसरातील मंदिर आणि स्मशानभूमीजवळ मध्यरात्री झालेल्या या गोळीबारामुळे करडे गावासह संपूर्ण शिरूर तालुक्यात खळबळ उडाली आहे.

**सात जणांविरोधात गुन्हा दाखल...**

या प्रकरणी आदित्य लंघे (रा. करडे, शिरुर) सागर ऊर्फ बबलू दत्तात्रय सोनलकर (रा. धायरी परिसर, पुणे) अथर्व ऊर्फ टिन्या रावसाहेब शेळके (रा. रांजणगाव गणपती, शिरुर) दाद्या ऊर्फ रोहन गणेश पंचमुख तसेच अन्य तीन अनोळखी व्यक्तींविरोधात शिरूर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता तसेच शस्त्र अधिनियमातील कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

**आरोपींची गंभीर गुन्हेगारी पार्श्वभूमी**

शिरुर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सागर ऊर्फ बबलू सोनलकर याच्याविरोधात शिरूर, हवेली आणि सिंहगड रोड पोलिस ठाण्यांत खुनाचा प्रयत्न, दरोडा, खंडणी, जबरी चोरी आणि शस्त्र अधिनियमांतर्गत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. तर अथर्व ऊर्फ टिन्या शेळके याच्याविरोधात रांजणगाव एमआयडीसी पोलिस ठाण्यात चोरी, मारहाण आणि



शस्त्र अधिनियमांतर्गत अनेक गुन्हे दाखल असल्याची नोंद आहे. त्याच्याविरोधात चॅप्टर केस तसेच महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ५६ अंतर्गत हद्दपारीचा प्रस्तावही असल्याचे सांगण्यात आले आहे.रोहन पंचमुख याच्याविरोधातही रांजणगाव पोलिस ठाण्यात मारहाण आणि अन्य गंभीर कलमांनुसार गुन्हे दाखल असून प्रतिबंधक कारवाई करण्यात आल्याची माहिती आहे.

**फिर्यादीविरोधातही गंभीर गुन्ह्यांची नोंद**

शिरुर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी निखील थेउरकर याच्या विरोधातही रांजणगाव एमआयडीसी, परभणी ग्रामीण आणि शिरूर पोलिस ठाण्यांत खून, खुनाचा प्रयत्न, शस्त्र अधिनियम, मारहाण आणि बेकायदा जमावासंबंधी गुन्हे दाखल आहेत. तसेच त्याच्याविरोधात महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ५६ अंतर्गत हद्दपारीचा प्रस्ताव पुणे येथील प्रांत कार्यालयात प्रलंबित असल्याचेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे ही घटना दोन गुन्हेगारी गटांतील जुन्या वैमनस्यातून घडली आहे का...? याचा तपास करणे आवश्यक ठरणार आहे. मात्र गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींचे गावागावात वाढणारे वर्चस्व आणि हातात सहज उपलब्ध होणारी पिस्तुले ही सामान्य नागरिकांसाठी गंभीर धोक्याची घंटा आहे.

**प्रतिबंधक कारवाया फक्त कागदी घोडे ठरत आहेत का...?**

या घटनेतील काही आरोपीच्या विरोधात यापुर्वीही अनेक गंभीर गुन्हे दाखल होते. चॅप्टर केस करण्यात आल्या होत्या. हद्दपारीचे प्रस्ताव तयार करण्यात आले होते. तरीही मध्यरात्री तीन दुचाकींवरून टोळके गावात पोहोचते, पिस्तुलातून तीन राऊंड फायर करते आणि घटना घडल्यानंतरही आरोपी, वाहन व शस्त्र पोलिसांच्या हाती लागत नाहीत.हि बाब पोलिस प्रशासनाच्या प्रतिबंधात्मक यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.

प्रतिबंधक कारवाई म्हणजे केवळ प्रस्ताव तयार करून वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविणे एवढेच आहे का...? अशा गुन्हेगारांच्या हालचालींवर प्रत्यक्ष नजर ठेवली जात होती का...? त्यांच्या ताब्यात पिस्तुल कोठून आले...? त्यांना शस्त्र पुरवणारी साखळी कोणती...? स्थानिक गुन्हे शाखा आणि पोलिस ठाण्याच्या गोपनीय यंत्रणेला या टोळक्याच्या हालचालींची माहिती का मिळाली नाही...? असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाले आहेत.

**शिरुर तालुक्यात कायदा-सुव्यवस्था धोक्यात...?**

गेल्या काही वर्षांपासुन शिरुर तालुक्यात खून, खुनाचे प्रयत्न, धारदार शस्त्रांचे हल्ले, गावठी पिस्तुले, टोळीयुद्ध आणि अवैध धंद्यांच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. एक महिन्यापुर्वी करडे घाटात दोन टोळींच्या गोळीबारात एका सराईत गुन्हेगाराचा मृत्यू झाला होता. त्यानंतर आता करडे गावात मंदिर परिसरात मध्यरात्री झालेल्या गोळीबारामुळे तालुक्यातील कायदा-सुव्यवस्था बिघडत असल्याचा आणखी एक गंभीर इशारा मानला जात आहे.

पोलिसांकडून घटना घडल्यानंतर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया होते; मात्र गंभीर गुन्हे घडण्यापूर्वीच त्यांना रोखण्यासाठी आवश्यक गुप्त माहिती संकलन, गुन्हेगारांवर पाळत, अवैध शस्त्रांचा शोध आणि प्रतिबंधक कारवायांची प्रभावी अंमलबजावणी होत आहे का, याचे आत्मपरीक्षण करण्याची वेळ शिरुर पोलिसांवर आली आहे. केवळ पोलिसांचा फौजफाटा गावात दाखल करून किंवा हद्दपारीचे प्रस्ताव प्रलंबित ठेवून गुन्हेगारीवर नियंत्रण येणार नाही. संबंधित आरोपींना तातडीने अटक करणे, वापरलेले पिस्तुल व वाहने जप्त करणे, शस्त्र पुरवठ्याचे मूळ शोधणे आणि या घटनेमागील संपूर्ण गुन्हेगारी साखळी उद्ध्वस्त करणे आवश्यक आहे. या घटनेचा पुढील अधिक तपास शिरुर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विनोद पाटील हे करत आहेत.

# दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या पुतळ्याचे २३ जुलै रोजी लोकार्पण..!

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते होणार उद्घाटन;पवार कुटुंबीयांची राहणार प्रमुख उपस्थिती

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या स्मृती जपण्यासाठी उभारण्यात आलेल्या १० फूट उंचीचा ब्राँझ धातूपासून बनवलेल्या पुतळ्याचे लोकार्पण गुरुवार, दि. २३ जुलै २०२६ रोजी सकाळी ९ वाजता बारामती येथे होणार आहे. महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते हा लोकार्पण सोहळा पार पडणार असून, खासदार पार्थ पवार, जय पवार तसेच पवार कुटुंबीय या कार्यक्रमास प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

बारामतीतील नटराज नाट्य कला मंडळाच्या पुढाकारातून स्व. अजितदादा पवार यांचा सुमारे १० फूट उंचीचा ब्राँझ धातूपासून तयार करण्यात आलेला भव्य पुतळा उभारण्यात आला आहे. हा पुतळा नटराज कलादालनासमोरील जागेत प्रतिष्ठापित करण्यात येणार असून, बारामतीच्या सांस्कृतिक आणि सामाजिक इतिहासात हा सोहळा महत्त्वाचा ठरणार असल्याचे मानले जात आहे.

कार्यक्रमाची सुरुवात बुधवार, दि. २२ जुलै रोजी पुतळ्याच्या पाद्य पूजनाने होणार आहे. त्यानंतर गुरुवार, दि. २३ जुलै रोजी सकाळी लोकार्पण सोहळा पार पडेल. याचवेळी स्व. अजितदादा पवार यांच्या जीवनकार्यावर आधारित छायाचित्र दालनाचेही उद्घाटन करण्यात येणार आहे. तसेच सर्वधर्मीय प्रार्थना, श्रद्धांजलीपर गीत, भजन आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकार्पण सोहळ्यास बारामतीसह परिसरातील नागरिक, कार्यकर्ते, महिला, युवक आणि अजितदादा पवार यांचे समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नटराज नाट्य कला मंडळाचे अध्यक्ष किरण गुजर यांनी सर्व नागरिक, कार्यकर्ते आणि भाविकांनी या ऐतिहासिक सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्व. अजितदादा पवार यांना अभिवादन करावे, असे आवाहन केले आहे.





# गणातील गावांच्या विकासासाठी पंचायत समिती सदस्या वाळुंज यांचा दौरा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्यातील जारकरवाडी पंचायत समिती गणाच्या सदस्या अंकिता वाळुंज यांनी आपल्या गणातील विविध गावांना भेटी देत ग्रामस्थांच्या अडीअडचणी जाणून घेण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. गावागावांतील मूलभूत सुविधा, शासकीय कार्यालयांची स्थिती तसेच नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

याच अनुषंगाने त्यांनी पहाडदरा येथील ठाकरवाडीला भेट दिली. या भेटीदरम्यान परिसरात वीज, रस्ते, आरोग्य सेवा तसेच इतर मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याबाबत त्यांनी संबंधित विभागातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधून आवश्यक त्या सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याच्या सूचना केल्या.यावेळी बोलताना अंकिता वाळुंज म्हणाल्या की, जारकरवाडी पंचायत समिती गणातील प्रत्येक गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध आहोत. ग्रामस्थांना भेडसावणाऱ्या समस्यांचा पाठपुरावा करून त्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील.

याशिवाय त्यांनी गणातील सर्व ग्रामपंचायत कार्यालये, जिल्हा परिषद शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य उपकेंद्रे तसेच अंगणवाड्यांना भेटी देण्यास सुरुवात केली असून, या ठिकाणी असलेल्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी आवश्यक ती मदत व पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.अंकिता वाळुंज यांच्या या दौऱ्यामुळे ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण असून, स्थानिक पातळीवरील प्रश्न मार्गी लागण्याची अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# सासवडच्या पुरंदरे वाडयात आषाढस्य प्रथम दिवसें कार्यक्रमात रसिक मंत्रमुग्ध..

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** महाकवी कालिदास दिन अर्थात आषाढस्य प्रथम दिवसें याचे औचित्य साधून दरवर्षी प्रमाणे याही वर्षी येथील ऐतिहासिक पुरंदरे वाड्यात रामपर्व हा संगीतमय कार्यक्रम सादर करण्यात आला. पुणे येथील व्यक्ताव्यक्त ग्रुप प्रस्तुत रामायणातील विविध प्रसंग आणि पात्रे यावर आधारीत या कार्यक्रमात सादर करण्यात आलेल्या अनेक रचनांनी रसिक मंत्रमुग्ध झाले. साहित्यप्रेमी कै नानासाहेब पुरंदरे व कै. सुनील पुरंदरे यांच्या प्रेरणेने त्यांच्या कुटुंबियांच्या वतीने गेली ऐकावन्न वर्षे हा उपक्रम राबवण्यात येत असुन सासवड शहरातील अनेक साहित्य प्रेमि नीं याला उत्स्फूर्त हजेरी लावली. कार्यक्रमाच्या प्रारंभी गीता पुरंदरे, कौशिक पुरंदरे अजय पुरंदरे प्रतिभा पुरंदरे व वर्षा बालकृष्णनं यांनी सर्व गायक वादक यांचा सन्मान करत उपस्थितांचे स्वागत केले. माजी



आमदार संजय जगताप, विजय कोलते, संजय काटकर आणि ॲड अण्णासाहेब खाडे यांनी आपल्या मनोगतातुन उपक्रमाचे कौतुक करत पुरंदरे परिवाराचे अभिनंदन केले. शंख निनाद करत नीलकांत या गीताने कार्यक्रम सुरु झाला. हेमंत आठवले जान्हवी गोखले यांच्या सुरेल गीत रचनांना शुभदा आठवले, केदार तळणीकर, वेधा पोळ,अवधूत धायगुडे, व प्राची भिडे यांनी सुरेख साथ केली पार्थ गोखले यांचे सुंदर सूत्रसंचालन व पिनाक यांची उत्तमध्वनीव्यवस्था कार्यक्रमाची उंची वाढवणारे ठरले. बागेमध्ये फिरताना सहज पाहिले रामाला, क्षमा करावी अबोध बाळा आदी रचनांनारसिकांच्या टाळ्या मिळाल्या.राम सीता चा गजर स्वरूपातील जयजयकाराने कार्यक्रमाची सांगता झाली. अवधूत धायगुडे यांच्या तालवाद्य सादरीकरणालाही रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली ॲड दिलीप निरगुडे, आप्पासाहेब पुरंदरे, शेवंता चव्हाण शशिकला कोलते, राजवर्धिनी जगताप, नंदकुमार ब्रम्हे, बंडूकाका जगताप, श्रीकांत कांबळे,प्रदीप पोमण,किरण पुरंदरे ,कलाताई फडतरे,श्रीकांत देशपांडे, किरण हेंद्रे, मंजुश्री निरगुडे, कल्याणी चिंबळकर, राजाभाऊ खळदकर निलेश शिंदे,सतीश निरगुडे, तानाजी सातव, ॲड विश्वास पानसे, संजय प्रभुणे इंदिरा पवार, कुमुदिनी पांढरे यांसह मोठ्या संख्येने रसिक यावेळी उपस्थित होते.

# हरिनामाच्या गजरात वळती गाव दुमदुमले

## आनंदवारी दिंडीने जपली वारकरी परंपरा



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**वळती :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त वळती गावात भक्ती, संस्कार आणि सामाजिक एकात्मतेचा अनोखा संगम पाहायला मिळाला. जि.प. प्राथमिक शाळा वळती, अंगणवाडी वळती आणि नरसिंह विद्यालय रांजणी (भागशाळा वळती) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला आनंदवारी दिंडी सोहळा उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. हरिनामाच्या गजरात, टाळ-मृदंगाच्या निनादात आणि अभंगांच्या स्वरांत संपूर्ण वळती गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले.

विशेष म्हणजे, लहानग्या विद्यार्थ्यांनी संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, वारकरी आणि विविध ऐतिहासिक व धार्मिक व्यक्तिरेखांची साकारलेली रूपे उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होती. विद्यार्थ्यांच्या या उत्स्फूर्त सहभागामुळे वारकरी परंपरा आणि सांस्कृतिक वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला.दिंडी मार्गावर ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे स्वागत केले. अनेकांनी हरिनामाचा गजर करत दिंडीत सहभाग नोंदविला. गावातील ज्येष्ठ नागरिकांनीही या उपक्रमाचे कौतुक करत, अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे मुलांमध्ये भक्तीभाव, शिस्त, संस्कार आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण होत असल्याचे मत व्यक्त केले.या सोहळ्यासाठी विविध मान्यवर, पालकवर्ग, शिक्षक, अंगणवाडी सेविका तसेच वळती ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. या आनंदवारी दिंडीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये भक्तीभाव, सांस्कृतिक मूल्ये, वारकरी परंपरेबद्दल आदर आणि सामाजिक एकात्मतेची भावना दृढ होण्यास मदत झाली. आषाढी एकादशीच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेला हा सोहळा वळतीकरांच्या स्मरणात दीर्घकाळ राहील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# साकव पुलावर माहिती फलकच नाही संरक्षक कठडे नसल्याने जीव धोक्यात!

## ठेकेदारांची मनमानी, प्रशासनाचे दुर्लक्ष?

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्यातील लोणी गावाजवळील ओढ्यावर सुरू असलेल्या साकव पुलाच्या कामाबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तब्बल वर्षभरापासून हे काम सुरू असतानाही संबंधित ठेकेदाराने कामाचा माहिती फलक लावलेला नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. हा पूल कोणत्या निधीतून, कोणत्या योजनेअंतर्गत बांधला जात आहे, कामाची मुदत किती आहे आणि काम पूर्ण झाले आहे की नाही, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नसल्याने पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

याहून गंभीर बाब म्हणजे पुलावर अद्याप संरक्षक कठडे बसविण्यात आलेले नाहीत. हा रस्ता पुढे बेल्हा-जेजुरी महामार्गाला जोडला जात असल्याने रांजणगाव, कारेगाव, सणसवाडी औद्योगिक वसाहतींकडे जाणारी अवजड वाहने आणि इतर हजारो वाहने दररोज या मार्गावरून धावतात. पुलाची उंची लक्षात घेता, एखादी दुर्घटना घडल्यानंतरच



प्रशासन जागे होणार का, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. लोणी गाव जारकरवाडी-पारगाव जिल्हा परिषद गटात येत असून या गटाचे नेतृत्व जिल्हा परिषद उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांच्याकडे आहे. गटातील विविध विकास कामांबाबत ठेकेदार मनमानी पद्धतीने काम करत असल्याची चर्चा स्थानिक पातळीवर सुरू असून, संबंधित कामांचा दर्जा, कामाची गती आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांची तातडीने तपासणी करण्याची मागणी जोर धरत आहे.सदर पुलावर कामाचा माहिती फलक नसल्यामुळे सार्वजनिक निधीतून सुरू असलेल्या कामांमध्ये पारदर्शकता आणि जबाबदारी आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा संबंधित यंत्रणेने या पुलाची तातडीने पाहणी करून माहिती फलक उभारणे, संरक्षक कठडे बसविणे आणि कामाचा दर्जा तपासून आवश्यक ती कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

## द•ख•ल

# भोरला अत्याचाराचा प्रयत्न फसला; अल्पवयीन मुलगी बचावली

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**भोर :** तालुक्यातील एका गावात ३४ वर्षीय नराधमाने एका १२ वर्षीय अल्पवयीन मुलीला घरात बोलावून अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याची घटना उघडकीस आली आहे.संबंधित मुलीने घटनास्थळाहुन अक्कल हुशारीने पळ काढल्यामुळे ती अत्याचारापासून थोडक्यात वाचली आहे. अविनाश रवींद्र गायकवाड (वय ३४ वर्षे) असे अत्याचार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीचे नाव आहे.भोर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून आरोपीला अटक केल्याचे पोलीस निरीक्षक निलेश माने यांनी सांगितले. याबाबत संबंधित अल्पवयीन मुलीच्या आईने भोर पोलीसात फिर्याद दिली आहे.या प्रकरणी भोर पोलिसांनी दिलेली माहिती अशी संबंधितअल्पवयीन मुलगी शाळेतून घरी जात होती. यादरम्यान आरोपी अविनाश याने तिला सांगितले की, तुझे वडील आमच्या घरात बसले आहेत अशी बतावणी करीत तिला घरात बोलावले. यानंतर सदर मुलीला बळजबरीने विवस्त्र करून अत्याचार करण्याच्या प्रयत्न करत असतानाच मुलीने हुशारकी बाळगत मला तहान लागली आहे.यासाठी मी स्वयंपाक

# प्रा. जगताप यांना पीएचडी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**जेजुरी :** शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम असून त्याचे बाजारीकरण होऊ नये, या विचाराने सन २००९ पासून विद्यार्थीकेंद्रित व आनंददायी शिक्षणासाठी कार्यरत असलेले प्रा. मधुसूदन निवृत्ती जगताप यांना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी कमल देसाई यांच्या वाङ्मयाचा अभ्यास या विषयावरील संशोधनासाठी विद्यावाचस्पती (पीएचडी) पदवी प्रदान केली आहे.त्यांचे संशोधन मुधोजी महाविद्यालय, फलटण येथील मराठी विभागाचे प्रा. डॉ. प्रभाकर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले. ग्रामीण शेतकरी कुटुंबातून उच्च शिक्षणापर्यंतचा त्यांचा प्रवास प्रेरणादायी मानला जात आहे. आपल्या यशामागे आई-वडिलांचे संस्कार, कुटुंबीयांचे सहकार्य आणि वडिलांचे त्याग असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.अध्यापन करत असलेल्या संस्थेचे संस्थापक सचिव तथा मा. आ.संजय जगताप, जिजामाता विद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार सागर तसेच वाघिरे महाविद्यालयाचे प्रा. डॉ. किरण गाढवे यांचे लाभलेले मार्गदर्शन संशोधनासाठी मोलाचे ठरल्याचे त्यांनी सांगितले.



# जुन्नरच्या विशेष लोकअदालतीत १३ प्रकरणे निकाली

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा :** न्यायप्रक्रिया जलद आणि सुलभ व्हावी यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे व तालुका विधी सेवा समिती, जुन्नर यांच्यावतीने शनिवारी दि. १८ जुलै रोजी जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, जुन्नर येथे विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले. या लोकअदालतीचे उद्घाटन जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. बी. शेलार यांच्या हस्ते झाले. यावेळी मार्गदर्शन करताना शेलार म्हणाले, न्याय आपल्या दारी या उपक्रमांतर्गत विधी सेवा प्राधिकरण थेट नागरिकांपर्यंत पोहोचले आहे. पक्षकारांनी लोकअदालतीत सहभाग घेऊन प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत. त्यामुळे वेळ आणि खर्च दोन्ही वाचेल.विशेष लोकअदालतीत प्रामुख्याने परक्राम्य विलेख अधिनियम १८८१ कलम १३८, बँकांची वसुली, पतसंस्था आणि फायनान्सच्या प्रलंबित व दावा दाखलपूर्व प्रकरणांचा समावेश होता. **एकूण निकाली प्रकरणे : १३, - वसूल झालेली रक्कम : ३५ लाख ७७ हजार ९३३ रुपये-** दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन आपसी तडजोडीद्वारे प्रकरणे निकाली काढण्यात आली.



# कोथळे विद्यालयाच्या आनंद वारीने दुमदुमले गाव

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे सुपे :** कोथळे येथील विद्या महामंडळ प्रशालेने आयोजित केलेल्या आनंद वारी उपक्रमातून विद्यार्थ्यांनी वारकरी परंपरेचे सुंदर दर्शन घडविले. विठ्ठल नामाच्या गजरात निघालेल्या दिंडीला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत संपूर्ण गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले.

विद्या महामंडळ प्रशाला, कोथळे येथे आनंद वारीचे आयोजन उत्साहात करण्यात आले. विठ्ठल आणि रुक्मिणीच्या वेशातील विद्यार्थ्यांच्या आगमनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मुलांनी वारकरी वेशभूषा परिधान करून हातात मृदुंग, टाळ आणि भगवे झेंडे घेत दिंडीत सहभाग घेतला, तर मुलींनी नऊवारी साडी परिधान करून डोक्यावर तुळस आणि विठ्ठलाची मूर्ती घेत वारकरी परंपरेचे जिवंत चित्र साकारले. विद्यालयात सामूहिक भजन, विठ्ठल नामाचा अखंड गजर आणि फुगडीचा कार्यक्रम झाल्यानंतर आनंद वारी गावातून काढण्यात आली. गावातील महिलांनी विठ्ठल-रुक्मिणीची पूजा करून दिंडीचे स्वागत केले. ठिकठिकाणी आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या.

## द•ख•ल

### बालदिंडीत साक्षात विठ्ठल-रुक्मिणींचे दर्शन



**कर्जत :** कर्जत तालुक्यातील शिंदे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उंबराचे लवण येथे शनिवारी आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर भक्तिमय वातावरणात बालदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. वारकरी परंपरेचा संस्कार चिमुकल्यांवर रुजविणाऱ्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी विठ्ठल, रुक्मिणी तसेच बाल वारकऱ्यांनी वेश परिधान करीत उपस्थितांची मने जिंकली. बाल-वारकरी विद्यार्थ्यांच्या हाती पताका, टाळ-मृदुंगासोबत हरिनामाचा गजर यासह महिलांच्या फुगड्या आणि फेर यांच्या संगतीने संपूर्ण परिसर पंढरीच्या वारीच्या भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. अंगणवाडी आणि शाळेतील चिमुकले विविध पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाल्याने दिंडीला विशेष आकर्षण लाभले. उंबराचे लवण येथील ग्रामस्थांनी रांगोळ्या काढून, पूजन करून, फटाक्यांच्या आतषबाजीत तसेच खाऊ व पंगतीच्या माध्यमातून बालवारकऱ्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. दिंडीत सहभागी मुलांसाठी जेवणाची पंगत, बिस्किटांचे पुडे, लाडू, चहाचे नियोजन करण्यात आले. त्यामुळे संपूर्ण गाव भक्ती, संस्कार आणि आनंदाच्या वातावरणात न्हाऊन निघाले. कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापिका राणी शिवाजी राऊत, सहशिक्षिका स्मिता भराटे, अंगणवाडी सेविका उषा घालमे, मदतनीस सुनिता घालमे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भरत कदम, उपाध्यक्षा मेघा घालमे, समितीचे सर्व सदस्य तसेच पालक यांच्या सहकार्याने करण्यात आले. तसेच अमोल घालमे, कुंडलिक घालमे, अमोल सुभाष घालमे, विष्णू घालमे, आप्पा चव्हाण आदींनी विविध उपक्रमात सहभाग घेत सहकार्य केले.

### नवजीवन विद्यालयात पालक मेळावा उत्साहात संपन्न




**एरंडगाव :** जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शेवगाव तालुक्यातील दहिगाव-ने येथील नवजीवन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता पाचवीत नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा मेळावा उत्साहात पार पडला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश खैरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे प्रशासकीय अधिकारी के. वाय. नजन तसेच समन्वयक विजय काशीद उपस्थित होते. यावेळी त्यांनी पालकांच्या विविध अडचणी जाणून घेत त्या सोडविण्यासाठी संस्था व विद्यालय नेहमीच प्रयत्नशील राहील, अशी ग्वाही दिली. प्रा. मच्छिंद्र पानकर यांनी प्रास्ताविकात विद्यालयात राबविण्यात येणारे विविध शैक्षणिक उपक्रम, स्पर्धा परीक्षा, गुणवत्ता विकास कार्यक्रम आणि शालेय कामकाजाची सविस्तर माहिती दिली. तसेच इयत्ता पाचवीला अध्यापन करणारे शिक्षक बाबासाहेब मोहिते, संतोष अडकिते, काशीद, पठाण, अनुप चव्हाण, सोनवणे व धिमते मॅडम यांची पालकांना ओळख करून दिली. या मेळाव्यास उपप्राचार्य जयराम नांगरे, सुभाष पवार, माऊली मोरे, विठ्ठल आगळे, संभाजी मुळे, सोमनाथ लिंबोरे, ज्ञानेश्वर पवार तसेच पालक प्रतिनिधी निर्मला सातपुते, मनीषा घोडके, अफसाना शेख यांच्यासह पालक उपस्थित होते.

### कर्जतमधील दूध डेअरींच्या चौकशीची मागणी

**राशीन :** कर्जत तालुक्यातील विविध दूध उत्पादक डेअरींमधून संकलित होणाऱ्या दुधाच्या गुणवत्तेबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू असून, सर्व डेअरींच्या दूध संकलनाची पारदर्शक पद्धतीने चौकशी करण्यात यावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. संबंधित विभागाने तालुक्यातील सर्व दूध उत्पादक डेअरींमधून दूधाचे नमुने नियमितपणे घेऊन अधिकृत प्रयोगशाळेत (लॅब) तपासणी करावी. तपासणीचे निष्कर्ष पारदर्शकपणे जाहीर करून जनतेसमोर मांडावेत, जेणेकरून नागरिकांचा दूधाच्या गुणवत्तेवरील विश्वास कायम राहील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. दूध हा सर्वसामान्यांच्या दैनंदिन आहारातील महत्त्वाचा घटक असल्याने त्याची गुणवत्ता आणि सुरक्षितता सुनिश्चित करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे अन्न व औषध प्रशासन, दुग्ध विकास विभाग आणि संबंधित यंत्रणांनी तातडीने कारवाई करून संपूर्ण तपासणी मोहीम राबवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### हातगावचा अथर्व मातंग आयआयटीसाठी गुवाहाटीकडे रवाना

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील हातगाव येथील मागासवर्गीय समाजातील होतकरू विद्यार्थी अथर्व बाबासाहेब मातंग याने जेईई ॲडव्हान्स परीक्षेत ९८.५२ टक्के गुण मिळवत देशातील अग्रगण्य शिक्षणसंस्थांपैकी



एक असलेल्या भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) गुवाहाटी येथे फिजिक्स (भौतिक शास्त्र) शाखेत प्रवेश मिळवून तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. अत्यंत स्पर्धात्मक असलेल्या या परीक्षेत मिळविलेल्या यशामुळे अथर्वच्या कर्तृत्वाचे सर्वत्र कौतुक होत आहे. आयआयटीमध्ये प्रवेश मिळविणे हे लाखो विद्यार्थ्यांचे स्वप्न असते. कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि जिद्दीच्या बळावर अथर्वने हे स्वप्न साकार केले आहे. ग्रामीण भागातून आणि सर्वसामान्य कुटुंबातून येत राष्ट्रीय स्तरावरील या यशाने त्याने शेवगाव तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे.अथर्वने आपले प्राथमिक शिक्षण बाळासाहेब भारदे प्राथमिक शाळा, माध्यमिक शिक्षण बाळासाहेब विखे इंग्लिश मिडियम स्कूल, तर उच्च माध्यमिक शिक्षण प्रीती सुधाजी डांगे ज्युनिअर कॉलेज येथे पूर्ण केले. शालेय जीवनापासूनच त्याची अभ्यासातील सातत्य, विज्ञान विषयाची आवड आणि ध्येयाप्रती असलेली निष्ठा यामुळे तो नेहमीच शिक्षकांच्या विशेष लक्षात राहिला. अथर्वचे वडील बाबासाहेब सुकदेव मातंग हे ग्रामविकास अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. मुलांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी त्यांनी सातत्याने प्रोत्साहन दिले. कुटुंबाचा पाठिंबा, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि अथर्वची मेहनत यामुळे हे यश शक्य झाल्याची भावना व्यक्त होत आहे.अथर्व हा हातगाव ग्रामपंचायतीचे प्रशासक सरपंच अरुण मातंग व संदीप मातंग यांचा पुतण्या असून, त्याच्या यशामुळे हातगावसह संपूर्ण बोधेगाव व शेवगाव तालुक्यात आनंदाचे वातावरण आहे. विविध सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी त्याचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अथर्वचे यश प्रेरणादायी ठरणारे असून, जिद्द आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, हे त्याने आपल्या यशातून सिद्ध करून दाखविले आहे.

# एफडीएचा खळबळजनक कारभार?

## डेअरीवरील बनावट दूध पावडर जप्तीची कारवाई पडद्याआड गायब!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील एका डेअरी केंद्रावर अन्न व औषध प्रशासन (एफडीए) पथकाने संशयास्पद दूध पावडर जप्त केल्यानंतरही पुढील कायदेशीर कारवाई झाली नसल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. संबंधित प्रकरणात अधिकाऱ्यांनी डेअरी चालकासोबत आर्थिक तडजोड करून कारवाई दडपल्याचा दावा करण्यात येत असून, या आरोपांची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी एफडीएच्या पथकाने तालुक्यातील एका ग्रामीण भागातील डेअरीवर छापा टाकून मोठ्या प्रमाणावर संशयास्पद दूध पावडर जप्त केली होती. आरोपानुसार, अशा प्रकरणात नमुने घेऊन प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवणे, पंचनामा करणे आणि आवश्यकतेनुसार पुढील कायदेशीर कारवाई करणे अपेक्षित असताना ती प्रक्रिया पूर्ण झाल्याचे कोणतेही स्पष्ट दस्तऐवज उपलब्ध नसल्याचे सांगितले जात आहे.



याच दरम्यान, संबंधित डेअरी चालकाकडून मोठी आर्थिक तडजोड झाल्यानंतर संपूर्ण प्रकरण दडपण्यात आल्याचा आरोप होत आहे.

जप्त केलेल्या दूध पावडरीचे पुढे काय झाले, ती प्रयोगशाळेत पाठवण्यात आली का, ती जप्तच ठेवण्यात आली का अथवा नष्ट करण्यात आली का, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नसल्याने संशय अधिक गडद झाला आहे.

विशेष म्हणजे, ही संशयास्पद दूध पावडर भेसळयुक्त दूध किंवा इतर दुग्धजन्य पदार्थ तयार करण्यासाठी वापरली जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितीत नागरिकांच्या, विशेषतः लहान मुलांच्या आरोग्याशी गंभीर स्वरूपाचा खेळ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणण्याची मागणी होत आहे.

तालुक्यात बनावट दूध व दुग्धजन्य पदार्थांच्या अवैध व्यवहारांबाबत यापूर्वीही तक्रारी होत आल्या आहेत. त्यामुळे एफडीएच्या कारवाईची पारदर्शकता आणि प्रभावी अंमलबजावणी याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, या प्रकरणाची अन्न व औषध प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी उच्चस्तरीय चौकशी करावी, त्या दिवशी कारवाईसाठी उपस्थित असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका तपासावी, उपलब्ध नोंदी व पुरावे पडताळावेत आणि दोषी आढळल्यास कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिक, दूध उत्पादक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे.

# केदारेश्वर परिसरात वृक्ष लागवड

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील संघर्ष योद्धा बबनराव ढाकणे श्री केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक ड. प्रतापराव ढाकणे यांच्या वाढदिवसानिमित्त केदारेश्वर कारखाना परिसरात वेग - वेगळ्या प्रकारचे १००० वृक्ष लागवड करण्यात आली आहेत. अशी माहिती कारखान्याचे कार्यकारी संचालक किरण शेलार यांनी दिली आहे. या बाबत ते म्हणाले की, कारखाना संचालक मंडळ व सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या वतीने मिळून ड. ढाकणे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून वृक्ष लागवड व त्याचे जतन ही काळाची गरज असल्याने वृक्षारोपणाचा निर्णय घेऊन तो पूर्ण केला आहे असे सांगून शेलार म्हणाले की, केदारेश्वर कारखाना चालू



ॲड. ढाकणे यांच्या वाढदिवसानिमित्त कारखाना परिसरात वृक्षारोपण

हंगामासाठी सज्ज असून ४ लाख टन उस गाळपासाठी प्रशासनाची तयारी सुरू असून त्या बाबत प्रशासकीय पातळीवरील तयारीही पूर्ण झाली असल्याबाबतची माहितीही शेवटी शेलार यांनी दिली असून ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी मात्र आपला हक्काचा कारखाना समजून आपला ऊस केदारेश्वर कारखान्यालाच देऊन सहकार्य करावे असेही आवाहन त्यांनी कार्यक्षेत्रातील व कार्यक्षेत्रबाहेरील ऊस नोंद करणाऱ्या शेतकऱ्यांना या वेळी केले आहे.

या वेळी जनरल मॅनेजर रमेश गर्जे, चीफ इंजिनिअर्स प्रवीण काळोखे, चीफ अकाउंट तीर्थराज घुंगरड, प्रशासकीय अधिकारी पोपटराव केदार, परचेस ऑफिसर तुकाराम वारे, चीफ केमिस्ट रामनाथ पालवे, सिव्हिल विभाग प्रमुख संजय चेमटे, सुरक्षा अधिकारी राजाराम केसभट, केन यार्ड सुपर वायझर किसन पोपळे, उपशेतकी अधिकारी कारभारी जावळे,संगणक विभाग राजेंद्र लवांडे, जनार्दन मनचुके या प्रमुखासह कारखान्यातील सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

### निकाळजे भाजपच्या जिल्हा कार्यकारिणीवर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा कार्यकारिणी सदस्यपदी शेवगाव तालुक्यातील हातगाव येथील आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ते रावसाहेब मारुती निकाळजे यांची नुकतीच निवड झाली असून निवडीबाबतचे पत्र पक्षाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालशिंग यांनी त्यांना आपल्या स्वाक्षरीने दिले आहे. निकाळजे हे गेली २५ ते ३० वर्षापासून आंबेडकर चळवळीमध्ये एकनिष्ठेने काम करत आहेत. तसेच ते स्व.माजी आमदार राजीव राजळे यांचे कट्टर समर्थक होते.उशिरा का होईना आ. मोनिका राजळे यांनी त्यांची भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा कार्यकारिणीवर निवड करून त्यांना न्याय दिला आहे. मात्र सत्ताधाऱ्यासोबत राहून जी कामे करता येतात ती कामे सत्तेत नसल्याने होत नाहीत. हे अनुभवल्यानंतर निकाळजे यांनी भारतीय जनता पक्षात जाण्याचा निर्णय घेतला असता त्यांची पक्षाच्या जिल्हापदधिकाऱ्यानी दखल घेत पक्षाच्या जिल्हा कार्यकारिणीच्या सदस्यपदी निवड केली आहे. दरम्यान निवडीबद्दल निकाळजे यांचे आ.मोनिकाताई राजळे, माजी खा. सुजय विखे, ॲड. विवेक राजेंद्र नाईक, संजय टाकळकर, महेश फलके, राम केसभट, मयूर हुंडेकरी, अशोक बाणाईत, अंबादास ढाकणे, डॉ.निलेश मंत्री, प्रा.भाऊसाहेब मुरकुटे, दत्तात्रय उन्मेघ,नवनाथ कांगणकर, गोरख कदम, सुनिल राजपूत, अविनाश म्हस्के, बाजीराव लेंडाळ, श्रीरंग गोर्डे, शिवाजी समिंदर,लक्ष्मण देवढे, कासम शेख, अशोक खिळे, संदीप देशमुख, अनिल परदेशी यांच्यासह परिसरातून अभिनंदन होत आहे.



# अविश्वास ठरावास अनुपस्थित ६ नगरसेवकांवर कारवाईची मागणी

## २२ ला होणार सुनावणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** कर्जत नगरपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांमधील राजकीय कुरघोडी न संपण्याची चिन्हे कायम असून उपनगराध्यक्ष पदाच्या अविश्वास ठरावाच्या वेळी अनुपस्थित असलेल्या ६ नगरसेवकांच्या विरोधात गटनेते सतीश पाटील यांनी जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांच्याकडे कार्यवाहीची मागणी केली. त्या अनुषंगाने अनुपस्थित ६ नगरसेवकांची २२ जुलैला सुनावणी ठेवण्यात आली.

कर्जत नगरपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांमध्ये राजकीय महत्वकांक्षा आणि पद बदलावर अंतर्गत धुसफूस सुरूच आहे. बुधवार, दि १५ रोजी उपनगराध्यक्ष संतोष मेहेत्रे यांच्यावर १३ नगरसेवकांनी अविश्वास ठराव दाखल केला होता. मात्र वरील १३ नगरसेवकांपैकी भाजपाच्या २ नगरसेवकांनी रिक्त होणाऱ्या



उपनगराध्यक्ष पदावर आपली वर्णी लागावी म्हणून नॉट-रीचेबल राहत प्रत्यक्ष अविश्वास ठरावास दांडी मारली. तर राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसचे गटाचे इतर चार घुले समर्थक देखील या विशेष सभेस गैरहजर राहिले. सदर बैठकीत ११-० असे मतदान पार पडले. मात्र गटनेते सतीश पाटील यांनी उपनगराध्यक्ष पदाच्या अविश्वास ठरावावर प्रशासनाने आयोजित केलेल्या विशेष सभेस उपस्थित राहावे यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसच्या एकूण १५ नगरसेवकांना व्हीप बजावला असताना वरील ६ नगरसेवक अनुपस्थित राहिल्याने महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम १९८७ चे कलम ३ (५) व ६, ७ प्रमाणे त्यांच्यावर कार्यवाही करण्याबाबत अहिल्यानगर जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठपुरावा केला. त्या अनुषंगाने सहआयुक्त (नपप्र) जिल्हाधिकारी कार्यालयाकडून डॉ. प्रदिप पठारे यांनी बुधवार, दि २२ जुलै रोजी यावर सुनावणी ठेवली आहे. या आशयाचे पत्र माजी नगराध्यक्षा रोहिनी घुले, मोनाली तोटे, ताराबाई कुलथे, भाऊसाहेब तोरडमल, भास्कर भैलुमे आणि संतोष मेहत्रे यांना बजावले आहे.

# खर्डा ग्रामपंचायतीच्या विभाजनाची अधिसूचना जारी

## नागोबाचीवाडी व पांढरेवाडी नव्या ग्रामपंचायती अस्तित्वात

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** जामखेड तालुक्यातील सर्वात मोठी आणि अनेक वर्षांपासून विभाजनाच्या प्रतीक्षेत असलेल्या खर्डा ग्रामपंचायतीच्या विभाजनाची अखेर राज्य शासनाने अधिसूचना जारी केली आहे. या अधिसूचनेनुसार खर्डा, नागोबाचीवाडी आणि पांढरेवाडी अशा तीन स्वतंत्र ग्रामपंचायती अस्तित्वात आल्या आहेत. त्यामुळे ग्रामस्थांनी जवळपास दोन वर्षे दिलेल्या सातत्यपूर्ण लढ्याला अखेर यश मिळाले असून, खर्डा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने शुक्रवारी राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करत नवीन ग्रामपंचायतींची घोषणा केली. त्यानुसार खर्डा ग्रामपंचायतीमध्ये खर्डा गाव व गवळवाडी, नागोबाचीवाडी ग्रामपंचायतीमध्ये नागोबाचीवाडी व मुंगेवाडी, तर पांढरेवाडी ग्रामपंचायतीमध्ये पांढरेवाडी, दरडवाडी व गितेवाडी या गावांचा समावेश करण्यात आला आहे. खर्डा ही जामखेड तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असून, विस्तीर्ण भौगोलिक क्षेत्र, वाढती लोकसंख्या आणि प्रशासकीय अडचणी यामुळे अनेक वर्षांपासून विभाजनाची मागणी होत होती. ग्रामसभेतील ऐतिहासिक ठराव, आंदोलने, खर्डा बंद, विविध शासकीय कार्यालयांतील सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि अखेर न्यायालयीन लढा अशा टप्प्यांतून हा संघर्ष पुढे गेला. छत्रपती संभाजीनगर येथील मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने शासनाचा पूर्वीचा नकारात्मक आदेश रद्दबातल ठरवत विभाजनाची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश दिल्यानंतर शासनाला अखेर अधिसूचना काढावी लागली.

या लढ्यात शिवपट्टण विकास युवा मंचचे कार्यकर्ते गणेश ढगे, ओंकार इंगळे, शरद गटकळ, बबलू सुरवसे, सुहास मदने, तेजस चावणे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. याचबरोबर याचिकाकर्ते ग्रामपंचायत सदस्य मदन गोलेकर पाटील, वैभव जमकावळे आणि श्रीकांत लोखंडे यांनीही विभाजनासाठी सातत्याने प्रयत्न केले. या संपूर्ण संघर्षात खर्डा शहरासह सहाही वाड्यांतील ग्रामस्थांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवत एकजुटीने साथ दिली. त्यामुळेच हा लढा केवळ काही व्यक्तींचा न राहता संपूर्ण गावाचा लोकआंदोलन म्हणून यशस्वी ठरल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. ग्रामस्थांच्या या एकजुटीची भावना ओळखून आमदार रोहितदादा पवार यांनी या प्रश्नात विशेष लक्ष घातले. विभाजनाच्या प्रस्तावासाठी आवश्यक असलेल्या विविध विभागांच्या मंजुऱ्या आणि मंत्रालय स्तरावरील पाठपुरावा त्यांनी करून घेतला. शासनाने प्रस्ताव फेटाळल्यानंतर न्यायालयात प्रभावी लढा उभा राहावा यासाठी आवश्यक संपूर्ण कायदेशीर यंत्रणा उभी करणे, नामांकित विधीज्ञांची नियुक्ती करणे, त्यांचे मानधन तसेच न्यायालयीन प्रक्रियेसाठी लागणारा लाखो रुपयांचा खर्च उचलणे, या सर्व बाबींमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. त्यामुळे ग्रामस्थांचा संघर्ष आणि आमदार रोहितदादा पवार यांचे भक्कम पाठबळ यामुळेच हा ऐतिहासिक निर्णय शक्य झाल्याची चर्चा परिसरात आहे. या निर्णयामुळे जामखेड तालुक्यातील ग्रामपंचायतींची संख्या आता ६० झाली असून, नव्या ग्रामपंचायतींमुळे स्थानिक प्रशासन अधिक परिणामकारक होईल, विकासकामांना गती मिळेल आणि नागरिकांना शासकीय सेवा अधिक सुलभपणे उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पिंपळगाव पिसा येथे रेणुका माता मंदिरात चोरी

## ६४ हजारांचे सोन्या-चांदीचे दागिने व दानपेटी लंपास

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बेलवंडी :** श्रीगोंदा तालुक्यातील पिंपळगाव पिसा येथील रेणुका माता मंदिरात अज्ञात चोरट्यांनी मुख्य दरवाज्याचे कुलूप तोडून चोरट्यांनी मंदिरातील देवीच्या मूर्तीवरील सुमारे ३०० ग्रॅम वजनाचा चांदीचा मुकुट, २६० ग्रॅम वजनाचे चांदीचे पादुके, अर्धा ग्रॅम वजनाची सोन्याची नथ तसेच दानपेटीतील रोख रक्कम असा एकूण सुमारे ६४ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला आहे. या घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण असून धार्मिक स्थळांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

याप्रकरणी पोलीस पाटील सुनील प्रकाश शिवणकर रा. पिंपळगाव पिसा यांनी बेलवंडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, मंदिराचे पुजारी गणेश रघुनाथ शेळार यांनी १७ जुलै रोजी रात्री नियमित पूजा करून मंदिर बंद केले होते. मात्र, १८ जुलै रोजी सकाळी सुमारे ७.२१ वाजता मंदिराचे मुख्य कुलूप तुटलेले दिसून आले. त्यानंतर ग्रामस्थांनी मंदिरात जाऊन पाहणी केली असता चोरी झाल्याचे निदर्शनास



आले.

घटनेची माहिती मिळताच बेलवंडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर, सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर, पीएसआय मोहन गाजरे, श्वान पथक तसेच फॉरेन्सिक लॅब पथकाने भेट दिली.मंदिर परिसराची पाहणी करून अज्ञात चोरट्यांचा शोध सुरू करण्यात आला असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास सुरू असून लवकरच आरोपी गजाआड केले जातील अशी माहिती सपोनि नंदकुमार सोनवलकर यांनी दिली.

चोरट्यांचा लवकरात लवकर शोध घेऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी मा. आमदार राहुलदादा जगताप जिल्हा परिषद सदस्य दिनुकाका पंदरकर, सरपंच किशोरबापू पंदरकर, उपसरपंच बापू कदम, मा.सरपंच सूर्यजित पवार, संचालक बंडू आबा पंदरकर, विनायक जगताप, सतीश झावरे, मयुर पंदरकर यांनी केली आहे.



दैनिक राष्ट्र सह्याद्री

रविवार दि .१९ जुलै २०२६



# पायी वारीत महिलेचे हृदयविकाराने निधन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार :** आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरला पायी वारीसाठी निघालेल्या कोल्हार-भगवतीपूर येथील ५८ वर्षीय कुसुम विष्णू कापसे (रा. कोल्हार ता. राहाता) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. गुरुवारी दुपारी लोणंद परिसरात त्यांना त्रास जाणवू लागला आणि उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. सेवानिवृत्त कुसुम कापसे यांचा हा पहिलाच वारीचा संकल्प होता. त्यांच्या पश्चात चार विवाहित मुली असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने कोल्हार परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शासकीय मदतीसाठी प्रयत्न करण्यात आले असून, स्थानिक ग्रामस्थ व सेवा मंडळाच्या सदस्यांनी अंत्यसंस्कारासाठी मदतकार्य केले.

# मतदार यादी पुनर्नरीक्षण मोहीम राष्ट्राच्या सुरक्षेशी निगडित

## प्रत्येक कार्यकर्त्याने योगदान द्यावे : पालकमंत्री राधाकृष्ण विखे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर, प्रतिनिधी :** मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) मोहीम ही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित नसून राष्ट्राच्या सुरक्षेशी संबंधित महत्त्वाची प्रक्रिया आहे. त्यामुळे प्रत्येक जबाबदार नागरिक व कार्यकर्त्याने या मोहिमेत सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन जलसंपदा तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.




अहिल्यानगर शहर मतदारसंघात सुरू असलेल्या मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेचा आढावा शनिवारी पालकमंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत घेण्यात आला. यावेळी आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योती गाढे, उपमहापौर धनंजय जाधव, प्रांताधिकारी सुधीर पाटील तसेच महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना मंत्री विखे म्हणाले, काही प्रभागांमध्ये मतदार मॅपिंगचे काम समाधानकारक झाले असले तरी काही ठिकाणी हलगर्जीपणा दिसून येत आहे. त्यामुळे शासकीय यंत्रणा व पक्षाच्या प्रतिनिधींमध्ये अधिक समन्वय आवश्यक आहे. एसआयआर मोहिमेला मुदतवाढ मिळाल्याने उर्वरित कालावधीत काम अधिक प्रभावीपणे पूर्ण करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

बीएलओंनी घरोघरी जाऊन पडताळणी करणे अपेक्षित असताना अनेक ठिकाणी तसे होत नसल्याची बाब त्यांनी प्रांताधिकारी सुधीर पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली. मतदार यादीतील दुबार नावे, मृत व्यक्तींची नावे व अन्य त्रुटी दूर करण्यासाठी पक्षाचे प्रतिनिधी आणि शासकीय यंत्रणेने संयुक्तपणे काम करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

पश्चिम बंगालचा दाखला देत विखे म्हणाले, मतदार यादीतील त्रुटी दूर करण्यासाठी अशा मोहिमा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. देशाच्या लोकशाही प्रक्रियेला बळकटी देण्यासाठी अचूक व पारदर्शक मतदार यादी तयार होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार संग्राम जगताप यांनीही मतदार याद्यांच्या अचूकतेवर भर देत शहर व ग्रामीण भागातील स्थलांतरामुळे अनेक मतदारांची नावे जुन्याच ठिकाणी कायम असल्याचे सांगितले. यामुळे जागरूकपणे काम करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. काही धार्मिक स्थळांमधून मतदार मॅपिंगचे काम सुरू असल्याची गंभीर तक्रारही त्यांनी बैठकीत मांडली.

यावर प्रांताधिकारी सुधीर पाटील यांनी मतदार मॅपिंगसह सर्व प्रक्रिया शासकीय कार्यालय किंवा संबंधित गावातील शाळांमध्येच करण्याची जबाबदारी बीएलओंवर असल्याचे स्पष्ट केले. कोणत्याही धार्मिक स्थळातून असे काम सुरू असल्यास ती गंभीर बाब असून संबंधित तक्रारीची चौकशी करण्याचे निर्देश मंत्री राधाकृष्ण विखे यांनी प्रांताधिकाऱ्यांना दिले.

# कोरडगावात विवाहितेवर अत्याचार

## गुन्हा दाखल, आरोपी फरार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोरडगाव ।** पाथर्डी तालुक्यातील कोरडगाव येथील खंडोबाची वाडी येथे एका विवाहित महिलेवर कथित अत्याचार झाल्याची गंभीर घटना समोर आली आहे . या प्रकरणी पाथर्डी पोलिस ठाण्यात अत्याचार व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत.

कुरुक्षेत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, १५ जुलै रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास पीडित विवाहित महिला उसाच्या शेतात काम करत असताना संशयित आरोपीने तिच्यावर जबरदस्ती करून कथित अत्याचार केल्याचा आरोप आहे. घटनेनंतर ही बाब कोणाला सांगितल्यास पीडित महिला व तिच्या पतीला जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

धमक्यांमुळे घाबरलेल्या महिलेने काही काळ ह प्रकार गुप्त ठेवला. मात्र, नंतर तिने कुटुंबीयांना घडलेला प्रकार सांगितल्यानंतर त्यांच्या समवेत पाथर्डी पोलिस ठाणे गाठून अधिकृत तक्रार दाखल केली. याप्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात अत्याचार व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी फरार झाला असून, त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे विशेष पथक कार्यरत असल्याची माहिती मिळाली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संदीप मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे .आरोपीला लवकरात लवकर अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी महिला संघटना व नागरिकांकडून करण्यात येत आहे.या घटनेमुळे पाथर्डी तालुक्यात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, महिलांच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महिलांवरील अत्याचाराच्या घटनांना आळा घालण्यासाठी कठोर व जलद कारवाईची गरज व्यक्त होत आहे.

# ज्ञानेश्वरी घाट नामकरणाला शासकीय मान्यता मिळवून द्या

## विश्व हिंदू परिषदेची पालकमंत्री विखे यांच्याकडे मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** संभाजीनगर ,पुणे महामार्गावरील पांढरीपुल येथील इमामपुर घाटास ज्ञानेश्वरी घाट अशा नामकरणास शासन स्तरावर मान्यता मिळवुन देण्यात यावी या मागणीचे निवेदन पालकमंत्री.राधाकृष्ण विखे यांना विश्व हिंदु परिषदेच्या वतीने देण्यात आले.

दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की.,श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी आषाढी पालखी दिंडी सोहळा गंगापुर येथील विठ्ठल आश्रमातील रामभाऊजी महाराज राऊत ह.भ.प.देविदास महाराज म्हस्के, श्रीराम महाराज झिंजुर्के, यांच्या मार्गदर्शनाखाली नेवासा ते पंढरपुर मागील वर्षापासुन भव्य दिव्य स्वरूपात निघत असुन मागील वर्षी दिंडी सोहळयात सहभागी महाराज व वारकरी मंडळीनी इमामपुर घाटातुन जात असताना शासनाकडे या घाटाचे नाव ज्ञानेश्वरी घाट असे देण्यात यावे. अशी भावना व्यक्त केली होती .

शासन पातळीवर या दिंडी सोहळयाचा मानाच्या दिंडयामध्ये सहभाग नोंदवुन शासनाने सुविधा पुरवाव्या अशी मागणी देखील करण्यात आली होती. त्यास अनुसरून शासनाने दिंडी सोहळयास यावर्षीपासुन मानाच्या पालखी सोहळयात समाविष्ट केले आहे. या निर्णयाचे वारकऱ्यांनी स्वागत करून आनंद व्यक्त केला आहे. मात्र पांढरीपुल येथील इमामपुर घाटाचे नाव ज्ञानेश्वरी घाट करण्यात आले नाही.

यावर्षी घाटातुन पालखी सोहळा मार्गक्रमण करत असताना महाराज मंडळी व वारकऱ्यांनी प्राथमिक स्वरूपात ज्ञानेश्वरी घाट नामफलकाचे टाळ मृदुंगाच्या गजरात घाटाच्या पायथ्याशी अनावरण केले आहे. तरी इमामपुर घाटास ज्ञानेश्वरी घाट असे शासन स्तरावर मान्यता



मिळवुन देण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वरे ना. राधाकृष्ण विखे यांच्याकडे केली

निवेदन देतेवेळी नेवासा तालुक्याचे महायुतीचे आ. विठ्ठलराव लंघे, विश्व हिंदु परिषदेचे जिल्हा संपर्क प्रमुख प्रशांत बहिरट,आदिनाथ पटारे यांच्यासह विश्व हिंदु परिषदेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# देवळाली नगर परिषदे विरोधात भिक मागो आंदोलन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा नगरपरिषद अंतर्गत असलेल्या रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली. तसेच नागरी सुविधांचा अभाव आणि नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे नगरपरिषद प्रशासनाकडून होत असलेल्या दुर्लक्षाच्या निषेधार्थ दि. १८ जुलै रोजी महाविकास आघाडी व वंचित बहुजन आघाडीच्या वतीने भिक मांगो आंदोलन करण्यात आले.




तालुक्यातील देवळाली प्रवरा नगरपरिषद हद्दीतील बहुतांश अंतर्गत रस्त्यांची अतिशय दुरवस्था झाल्याचा आरोप आंदोलन कर्त्यांनी केला. खड्डेमय रस्त्यांमुळे नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. पावसाळ्यात अनेक ठिकाणी पाणी साचत असल्याने महिला, ज्येष्ठ नागरिक आणि शालेय विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. देवळाली प्रवरा नगरपालिका प्रशासन नागरी समस्या सोडविण्यात पूर्णपणे अपयशी ठरल्याचा आरोप आंदोलन कर्त्यांनी केला. तसेच तातडीने रस्त्यांची दुरुस्ती व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

प्रसंगी नगरसेवक दासू पठारे, सुनीता थोरात, शरद वाळुंज, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक संतोष चोळके, वैभव गिरमे, कृष्णा मुसमाडे, प्रहारचे आप्पासाहेब ढुस, ॲड. कुमार भिंगारे, विश्वास पाटील, प्रशांत काळे, भगवान गडाख, विजय कुमावत, विजय गव्हाणे, राजू थोरात,अनिल चव्हाण, मदिना शेख, नानासाहेब कदम, पूनम कदम, विशाल गाडे, श्रीकांत नालकर, मनीष देठे, किरण पंडित, अक्षय पठारे, किरण पठारे, रवी मोरे, बाळासाहेब पडागळे, तैनूरभाई पठाण, ललित चोरडिया, माऊली भागवत यांच्यासह महाविकास आघाडी व वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने आंदोलनात सामील झाले होते. आंदोलना दरम्यान पावसाने हजेरी लावली असता पावसात देखील आंदोलन सुरू होते.

# नेवासा पोलिसांची धडक कारवाई

## १ लाखांहून अधिकचा अवैध 'मावा' साठा जप्त; एकावर गुन्हा दाखल अटक

**प्रतिनिधी । राष्ट्रसह्याद्री**

**नेवासा :** मानवी आरोग्यास घातक असलेल्या 'मावा' निर्मिती आणि विक्री विरोधात नेवासा पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी १ लाख १ हजार २०० रुपयांचा तयार मावा आणि कच्चा माल जप्त केला असून, एका इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, १८ जुलै २०२६ रोजी पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना समजले की, पाथरवाला (ता. नेवासा, जि. अहिल्यानगर) येथील अमोल लक्ष्मण खाटीक हा आपल्या राहत्या घराच्या




आडोशाला असलेल्या पत्राच्या शेडमध्ये मशीनच्या साहाय्याने मानवी आरोग्यास घातक असा 'मावा' तयार करत आहे. या माहितीच्या आधारे नेवासा पोलीस पथकाने पंचांसह छापा टाकला असता, घटनास्थळी तयार मावा, सुपारी, तंबाखू आणि मावा बनवण्याचे मशीन असा एकूण १,०१,२०० रुपयांचा मुद्देमाल मिळून आला.या प्रकरणी अमोल लक्ष्मण खाटीक याच्या विरोधात नेवासा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १२३, २२३, २७४, २७५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली. ही धडक कारवाई अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक ममुक्का सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व सोमनाथ वाकचौरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरु यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, सपोनि अमोल पवार, पोउपनि संदीप शिंदे, पोहवा रविंद्र शेळके, पोशी संदीप ढाकणे, पोशी गणेश फाटक व पोशी आप्पासाहेब वैद्य यांनी केली. या मावा बनवणाऱ्यांवर आता १० वर्षांपर्यंत कारावास आणि दंडाची तरतूद असलेल्या भा.न्या.सं. कलम १२३ नुसार कडक कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक ममुक्का सुदर्शन यांनी दिले आहेत. परिसरात अशा प्रकारचे अवैध कृत्य कोठेही सुरू असल्याचे निदर्शनास आल्यास नागरिकांनी त्वरित 'डायल ११२' वर किंवा स्थानिक पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# सराफावर हनी ट्रॅप

## राहुरी पोलिसांत दोन महिलांवर खंडणीचा गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** एक सराफ व्यापारी झोपेत असताना एका महिलेने त्यांच्या सोबत फोटो काढले. तसेच व्हिडिओ कॉल करुन त्याचे स्क्रिनशॉट काढले. नंतर ते फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देऊन १० लाख रुपयांची मागणी करण्यात आली. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात दोन महिलांवर खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

किरण गंगाधर उदावंत, (वय ४७ वर्षे) हे सराफ व्यापारी असुन ते राहुरी तालुक्यातील ताहराबाद येथे राहतात. त्यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि, किरण उदावंत यांची पत्नी घरात नसल्याने आईची व मुलांची काळजी घेण्यासाठी कोणीतरी पहा असे त्यांनी त्यांची नातेवाईक मंदा मैड हिला सांगितले होते. तेव्हा तिने सांगितले की, माझी मुलगी मनिषा हि कामाला येत जाईल. त्यानंतर मनिषा मैड हिच्या भावाचे लग्नासाठी किरण उदावंत हे संगमनेर तालुक्यातील आधी येथे गेले होते. रात्रीच्या वेळी ते घरात झोपलेले असताना आरोपी मनिषा मैड हिने त्यांच्या सोबत झोपलेल्या अवस्थेत काही फोटो काढले. त्यानंतर ती किरण उदावंत यांना म्हणाली कि, मला तुम्ही आवडता, माझे तुमच्यावर प्रेम आहे. नंतर तीने बऱ्याच वेळा व्हिडिओ कॉल करुन त्याचे स्क्रीनशॉट काढुन ठेवले. तेव्हा किरण उदावंत यांनी विरोध केला असता तिने मोबाईलमध्ये काढलेले फोटो दाखवुन ते फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली. त्यानंतर आरोपी महिला म्हणाली की, तु एकतर आम्हाला १० लाख रुपये दे, नाहीतर तु माझी मुलगी मनिषा मैड हिच्याशी लग्न कर. तेव्हा किरण उदावंत यांनी लग्नास नकार दिला. त्यानंतर आरोपींनी दि. २४ जानेवारी २०२५ रोजी किरण उदावंत यांच्याकडुन लग्न करण्या बाबत संगमनेर येथे बळजबरीने नोटरी करुन घेतली. त्यानंतरही उदावंत यांनी लग्नाला विरोध केला असता त्यांना सातत्याने मानसिक त्रास दिला. नंतर आरोपींनी राहुरी येथील उदावंत यांच्या दुकानात जाऊन फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन १० लाख रुपयांची मागणी केली. त्यानंतर उदावंत यांनी तिला कधी ५ हजार कधी १० हजार रुपये फोन पे तर कधी रोख रक्कम देत होते. आरोपीं पासून वाचण्यासाठी उदावंत यांनी दि. १५ एप्रिल २०२६ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय अहिल्यानगर येथे पत्र दिले. तरीही आरोपींचा त्रास कमी झाला नाही. ते नेहमीच फोटो व पेपरला बातमी व्हायरल करुन बदनामी करण्याची धमकी दिली.

दि. ९ जुलै २०२६ रोजी आरोपी महिला उदावंत यांच्या राहुरी शहरातील मल्हारवाडी रोड येथील दुकाना समोर आल्या आणि पून्हा धमकी देवून १० लाख रुपये खंडणीची मागणी केली. उदावंत यांनी दि. १५ जुलै २०२६ रोजी आरोपी मनिषा मैड हिला खंडणी म्हणुन २ लाख रुपये दिले. त्यानंतर किरण गंगाधर उदावंत यांनी आरोपी महिलांच्या त्रासाला कंटाळून राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून आरोपी मनिषा दिलीप मैड, रा. आश्वी, ता. संगमनेर व मणियार नामक एक महिला अशा दोन महिलांवर गुन्हा रजि. नं. ८०३/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०८ (२), ३५१ (२), ३५२, ३ (५) प्रमाणे खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

# घरात घुसून महिलेला मारहाण; तिघींविरुद्ध राहुरी पोलिसांत गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

राहुरी : राहुरी खुर्द येथील पाण्याच्या टाकीजवळ राहणाऱ्या एका २६ वर्षीय महिलेला घरात घुसून तिघा महिलांनी मारहाण केल्याची घटना गुरुवारी (दि. १७) सकाळी घडली. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात तिन्ही महिलांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्योती अमोल भोसले या सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास घरातील स्वयंपाकघरात भांडी घासत असताना रेखा छबू कुसमोडे, अनुराधा महेश सागर आणि डरका गुंजाळ (सर्व रा. राहुरी खुर्द) या त्यांच्या घरात अनधिकृतपणे शिरल्या. फिर्यादीच्या सासूला यापूर्वी झालेल्या मारहाणीच्या कारणावरून दोन्ही पक्षांमध्ये काही दिवसांपासून वाद सुरू असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

घरात आल्यानंतर डरका गुंजाळ हिने फिर्यादीला जाब विचारत वाद घातला. त्यानंतर डरका गुंजाळ हिने फिर्यादीचा हात धरला, तर रेखा कुसमोडे हिने हातातील दगड डोक्यात मारल्याने ज्योती भोसले यांच्या डोक्याला दुखापत झाली. त्यानंतर तिन्ही महिलांनी मिळून त्यांना जमिनीवर पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

या घटनेप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ८०२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३३, ११८(१), ३५१(२), ३५२ व ३(५) अंतर्गत तिघींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

# संकुचित विचार न ठेवता गणेश कारखान्याचे हक्काचे ३८ कोटी परत करा, आम्ही स्वागत करू : विवेक कोल्हे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वाकडी :** गणेश कारखाना रोलर पूजन उत्साहात संपन्न झाले. यावेळी आ. विवेक कोल्हे मनोगत व्यक्त करताना म्हणाले साखर उद्योग अडचणीत आहे त्यासाठी आपण मुख्यमंत्र्यांची शिष्टमंडळ घेऊन भेट घेणार आहोत.

गणेश कारखाना गाळप हंगाम आपल्याला सर्वांच्या सहकार्याने यशस्वी करायचा आहेत.या पूर्वीचे हंगाम प्रतिकूल परिस्थितीत देखील आपण यशस्वी केले आहे. आधी आपण सत्ताधारी पक्षात होतो मात्र आता आपण सत्तेत देखील आहोत. यापुढे कुठल्या अडचणी येणार नाही आणि आल्या तरी त्या सोडवण्याची आणि अडचणींना जशास तसे उत्तर देण्याची तयारी आपण ठेवू.कर्मचाऱ्यांचे प्रश्न बहुतांशी सोडवले उर्वरित देखील येणाऱ्या काळात सोडण्यात येतील.

राजकीय व मानवनिर्मित अडचणीतून श्री गणेश कारखाना अतिशय संघर्षातून आपण पुढे नेतो आहोत.यावेळी आपण ३.५ लाख गाळपाचे उद्दिष्ट ठेवलेलं आहे.तांत्रिक अडचणीमुळे मागील काळात झालेल्या त्रुटी दूर करणार आहोत.गणेशच्या कार्यक्षेत्रातील ऊस इतर कारखाने घेऊन जातात याचा फटका यापूर्वी बसला आहे त्यावर आपण उपाययोजना करणार आहोत.

जिल्हा बँकेच्या माध्यमातून कारखान्याला आर्थिक अडचणीतून मदत करण्याचा प्रयत्न झाला यापुढे आगामी काळात जिल्हा बँकेवर समविचारी मंडळी येईल आणि बिनविरोध होईल या दृष्टीने आम्ही प्रयत्न करणार आहे. त्यामुळे गणेश कारखान्याला देखील यामुळे मदतच होणार आहे.

राजकीय मतभेद बाजूला ठेवून सभासदांनी दिलेला निकाल मान्य करायचा असतो मात्र निकालाच्या दिवशीच रेकॉर्ड पळवा पळवी येथे झाली होती. १७ कोटीचे आम्हाला घेणे आहे अशी नोटीस आपल्या संचालक मंडळाला देण्यात आली होती. त्यानंतर थेट ८१ कोटी घेणे आहे असा लवाद टाकला गेला. त्या लवादात आपण आपलेच २८ कोटीपेक्षा अधिक रक्कम त्यांच्याकडून घेणे निघते. मात्र त्यावर पुढे काहीही झाले नाही.आपण न्यायालयात लढाई लढतो आहे.यासह जिल्हा बँकेतील देखील कर्जासाठी अडचणी विरोधकांनी आणल्या.सुप्रीम कोर्ट पर्यंत आपल्या विरोधात लढाई विरोधकांनी सुरू ठेवली आहे.

आम्ही निवडणूक लढवणार नाही असे कुणी म्हणत असतील तरी त्यांच्या मनात एक आणि करतील एक त्यामुळे गाफील आपण राहणार नाही. गणेश कसा बंद पडेल व तेथील



नागरिकांना नंतर उपकाराची भाषा करून तुमचा ऊस आम्ही घेऊन जातो असे भासवण्याचा हा प्रयत्न वाटतो आहे.

राहुरी कारखान्याची कुठलीही मागणी नसताना त्यांना पाच कोटी गणेशचे देण्यात आले ते आता आठ कोटीहून अधिक्म झाले आहे. गणेश कारखाना आठ वर्ष प्रवराने चालवला,करार संपल्यानंतर देखील एक वर्ष त्यांच्या विचाराच्या संचालकांनी चालवला.सुजय विखे हे या संस्थेचे सभासद नाही तरीही त्यांच्या संचालक मंडळांनी त्यांना सह्यांचा अधिकार दिला त्याचा गैरवापर होऊन पाच कोटी रुपये राहुरी कारखान्याला गणेशचे देण्यात आले. यासह मोठे मन दाखवत गणेशच्या हक्काचे सभासदांचे ३८ कोटी परत करावे असे आवाहन केले.

गणेश कारखाना रोलर पूजनाला मी स्वतः बसलो कारण जबाबदारी स्वीकारण्याची तयारी आपण ठेवली आहे ती जबाबदारी झटकणार नाही. तुमचे जसे सभासदांचे पैसे तुम्हाला वाटत आहे तसे आमच्याही गणेशच्या सभासदांचे ३८ कोटी आम्ही घेतल्याशिवाय राहणार नाही.चेअरमन सुधीर लहारे म्हणाले, आम्हाला न्यायालयात त्रास देण्यापेक्षा आमचे हक्काचे पैसे तुमच्याकडे आहे ते आपण देण्याचे मोठेपण दाखवा. केवळ विरोध करून काही साध्य होणार नाही. याच मतदारसंघातील हा कारखाना आहे तो बंद पडण्यासाठी नाही तर पुढे जाण्यासाठी मदत करावा मात्र ते करण्यासाठी विरोधक तयार नसता.आमचा ऊस कोणी पळवला हे आम्हाला ठाऊक आहे.जेव्हा गाळप होत नव्हते तेव्हा उलट आम्ही संजीवनीची मदत घेतली या उलट प्रवरा आणि कोळपेवाडी यांनी ऊस नेला हे सर्वांना ठाऊक आहे. बाळासाहेब थोरात आणि आ.विवेक कोल्हे हे आमच्या पाठीशी भक्कम उभे आहे त्यामुळे आम्ही पारदर्शक कारभार करतो आहे. गट ऑफिसला देखील त्रास देणे सुरू आहे, गणेशला ऊस कमी मिळावा यासाठी विरोधक प्रयत्न करत आहे. अशा प्रकारचे मनोगत चेअरमन सुधीर लहारे यांनी व्यक्त करत विरोधकांचा समाचार घेतला व येणारा हंगाम यशस्वी करू असा विश्वास व्यक्त केला.माजी मंत्री शंकरराव कोल्हे साहेब यांनी कायमच ही कामधेनु वाचण्यासाठी पुढाकार घेतला. सुसंस्कारित नेतृत्व कसे असावे हे आमदार विवेक कोल्हे यांच्याकडे बघून कळते असेही लहारे म्हणाले.स्वामी सहजानंद भारती आश्रमाचे मठाधिपती प.पूज्य चैतन्यगिरीजी महाराज,चेअरमन सुधीर लहारे, व्हा.चेअरमन विजय दंडवते,श्री गणेशचे संचालक सर्व संचालक,संगमनेर कारखान्याचे कार्यकारी संचालक घुगरकर साहेब, एम.डी जी.बी शिंदे,अधिकारी, सभासद,कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.